रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १६४
www.ramprahar.com

सोमवार, ३० डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

श्रीवर्धनमध्ये गाडीच्या बोनेटवर बसून स्टंटबाजी/२

सांकशी गडावर आढळल्या तीन पुरातन मूर्ती/५

रायगड जिल्हा अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेला प्रारंभ/८

## तारापूर एमआयडीसीतील तीन कंपन्यांना आग

**बोईसर :** तारापूर एमआयडीसीतील एका केमिकल कंपनीमध्ये रविवारी (दि. २९) सायंकाळी भीषण आग लागल्याने परिसरात खळबळ उडाली. आग इतकी प्रचंड होती की आजूबाजूच्या दोन छोट्या कंपन्यांत ही आग पसरली. केमिकल कंपनी स्टार्लिंग हॉटेलच्या समोर स्थित आहे. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू होते. मिळालेल्या माहितीनुसार आग लागल्यानंतर कंपनीतून मोठ्या प्रमाणात धूर निघत होता, जो दूरवरूनही दिसत होता. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या अनेक टीम काम करत आहेत आणि बचावकार्य मोठ्या वेगाने सुरू आहे. स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी घटनास्थळी सुरक्षा व्यवस्था वाढवली असून परिसराला घेराव घालत कार्यवाही सुरू केली आहे.



# नववर्षात एप्रिलमध्ये होणार नवी मुंबई विमानतळ कार्यान्वित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई विमानतळावर रविवारी (दि. २९) पहिल्या व्यावसायिक विमानाचे यशस्वीरित्या लँडिग झाले. इंडिगो ३२० हे विमान येथील धावपट्टीवर सुरक्षितपणे उतरले. दरम्यान, नव्या वर्षात १७ एप्रिल २०२५ रोजी प्रवासी आणि कार्गो विमानसेवा येथून सुरू होणार असल्याची माहिती नवी मुंबई विमानतळाचे सीईओ कॅप्टन बी.व्ही. जे.के. शर्मा यांनी दिली.

नवी मुंबई विमानतळावर दुपारी दीडच्या सुमारास पहिले व्यावसायिक इंडिगो ३२० विमान लँडिंग झाल्यानंतर पाण्याची सलामी देण्यात आली. या वेळी उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, विमानतळ प्राधिकरण व सिडकोचे अधिकारी उपस्थित होते. विमानाचे यशस्वी लँडिंग झाल्यानंतर आमदार महेश बालदी यांच्यासह अधिकारीवर्गाने आनंद व्यक्त केला.

दरम्यान, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे सीईओ बी.व्ही.जे.के. शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार १७ एप्रिल रोजी पहिले प्रवासी आणि कार्गो विमान सुरू होईल. त्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे. सर्व परवानग्या मार्चपर्यंत मिळतील. १७ एप्रिल रोजी देशांतर्गत विमानसेवेचे उद्घाटन होईल, तर आंतरराष्ट्रीय विमानसेवेसाठी जून उजाडेल.



## पहिल्या व्यावसायिक विमानाचे यशस्वीरित्या लँडिग

यापूर्वी ११ ऑक्टोबर रोजी सी २९५ हे भारतीय वायुदलाचे विमान गांधीनगरहून, तर सुखोई ३० हे पुण्यातून आलले विमान नवी मुंबई विमानतळावर उतरले होते.

नवी मुंबई विमानतळाचा रनवे, सिग्नल यंत्रणा अशी सर्व महत्त्वाची कामे जवळपास पूर्ण झाल्याची माहिती समोर येत असून विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे.



**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमिपूजन झालेल्या लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा एकेक टप्पा पार होतोय. या विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे नाव मिळावे यासाठी भूमिपुत्रांनी संघर्ष केला. आज येथे व्यावसायिक विमानाचे यशस्वी लँडिग झाले आणि १७ एप्रिलला प्रत्यक्ष विमानतळ सुरू होतंय याचा निश्चित आनंद आहे. या विमानतळामुळे राज्याचा एक टक्का जीडीपी वाढणार असून एक लाख लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे.**

**–महेश बालदी, आमदार, उरण विधानसभा मतदारसंघ**

### कल्याण अत्याचार व हत्या प्रकरण

## विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांची नियुक्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

कल्याणमधील अल्पवयीन मुलीच्या अत्याचार आणि हत्या प्रकरणात विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकरणातील नियुक्तीबाबत मुख्यमंत्र्यांनी फोनद्वारे आपल्याला कळवल्याचे उज्वल निकम यांनी स्पष्ट केले आहे. कल्याण पोलिसांनी याबाबत आरोपपत्र दाखल केल्यानंतर न्यायालयीन कामकाजाला सुरुवात होणार असल्याचेही ते म्हणाले.

कल्याण येथे एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार करत हत्या केल्याची धक्कादायक घडली होती. या घटनेत नराधम विशाल गवळी आणि त्याची पत्नी यांनी मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी एका रिक्षाचा वापर केला होता. ती रिक्षाही पोलिसांनी जप्त केली आहे. नराधम विशाल गवळी स्वतः रिक्षा चालवत होता, तर त्याची पत्नी साक्षी मृतदेह घेऊन मागील सीटवर बसली होती. बापगावमधील कब्रस्तानजवळ मृतदेह फेकून या दोघांनी पळ काढला होता. विशाल गवळीला शेगावमधून अटक करण्यात आली तसेच त्याच्या पत्नीलाही अटक करण्यात झालेली आहे.

या संदर्भात विशेष सरकारी वकील उज्वल निकम म्हणाले की, समाजात अशा ज्या घटना घडतात त्याबाबत आत्मचिंतन करण्याची गरज आहे. या गुन्ह्यात ताबडतोब शिक्षा होणे व लवकरात लवकर कामकाज पार पाडणे हे उद्दिष्ट आहे.

## बीड हत्या प्रकरणात आरोपींचे बँक खाते गोठवले

**बीड : प्रतिनिधी**

मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सीआयडीने मोठी कारवाई केली आहे. सीआयडीने वाल्मिक कराडसह चार आरोपींचे बँक खाते गोठवल्याची माहिती समोर आली आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास सीआयडीने सुरू केला आहे. बीडमधील या खंडणी आणि हत्या प्रकरणातील फरार आरोपींसाठी सीआयडीच्या नऊ पथकांकडून तपास सुरू आहे. जवळपास दीडशे अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकडून तपास केला जात आहे. याच प्रकरणात आता मोठी कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांकडून फरार वाल्मिक कराडसह चारही आरोपींचे बँक खाते गोठवण्यात आले आहे. त्यांच्या पासपोर्टविषयीदेखील कारवाई करण्यात आली आहे. या चौघांचा राज्यासह देशभरात तपास सुरू आहे. त्यामुळे लवकरच पोलीस या आरोपींच्या मुसक्या आवळण्याची शक्यता आहे.

**पनवेल : लवणकार समाजाचे नेते लक्ष्मण उप्पारा, परशु उप्पारा यांनी रविवारी लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी पनवेल–उरण आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील, कोषाध्यक्ष विजय गायकर, ज्येष्ठ पत्रकार दीपक म्हात्रे, बी.बी. पाटील आदी उपस्थित होते.**





## निवडक

### द. कोरियात भीषण विमान अपघातात १७९ जणांचा मृत्यू

**सेऊल :** कझाकिस्तानमध्ये विमान दुर्घटनेची घटना ताजी असताना दक्षिण कोरियात रविवारी (दि. २९) झालेल्या भीषण विमान अपघातात १७९ जणांचा मृत्यू झाला आहे. १७५ प्रवासी आणि सहा क्रू मेंबर्सना घेऊन बँकॉकहून आलेले हे विमान मुआन आंतरराष्ट्रीय विमानतळावर लँडिंग करताना क्रॅश झाले.

### भारताच्या स्पॅडेक्स मोहिमेतील उपग्रहांचे आज होणार प्रक्षेपण

**श्रीहरिकोटा :** भारताच्या स्पॅडेक्स मोहिमेतील दोन उपग्रह सोमवारी (दि. ३०) श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून रात्री ९ वाजून ५८ मि. पीएसएलव्ही–सी६० रॉकेटमधून प्रक्षेपित करण्यात येणार आहेत. भारताला या मिशनद्वारे अमेरिका, रशिया आणि चीनच्या बरोबरीने अंतराळात 'डॉकिंग' करण्याची क्षमता साध्य करायची आहे. लो–अर्थ वर्तुळाकार कक्षेत फिरताना हे दोन उपग्रह एकमेकांशी जोडले जातील.





**पनवेल :** श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा आणि चांगू काना ठाकूर महाविद्यालय आयोजित राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे यंदा ११वे वर्ष असून या स्पर्धेची प्राथमिक फेरी पूर्ण झाली आहे. खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात झालेल्या मुंबई, ठाणे, कल्याण व इतर केंद्राच्या प्राथमिक फेरीला नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष व महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन कलाकारांना गौरविले. या वेळी अटल करंडक टीममधील अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, अमोल खेर, गणेश जगताप, वैभव बुवा, आदित्य उपाध्ये, कोमल पाटील, दिव्या शेट्ये, परीक्षक आशीर्वाद मराठे, मानसी दोशी–मराठे आदी उपस्थित होते. स्पर्धेची अंतिम फेरी १० ते १२ जानेवारीदरम्यान फडके नाट्यगृहात होणार आहे.

## कोर्लई येथे अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

### आरोपीविरोधात गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील कोर्लई येथे एका नराधम तरुणाने अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना घडली आहे. याबाबत पीडित मुलीच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीनुसार रेवदंडा पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आर्यन दीपक कोटकर (वय २२, रा. कोर्लई) असे आरोपीचे नाव असून त्याने तेथील समुद्र किनारी उभ्या करण्यात आलेल्या होडीमध्ये नीच कृत्य केले. पीडित अल्पवयीन मुलगी ही लहान भाऊ व बहीण यांच्यासोबत समुद्र किनारी प्रातः विधीसाठी आली होती. त्या वेळी नराधमाने तिला मच्छीमार बोटीत नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

घडलेल्या प्रकाराबाबत पीडितने आईला सांगितल्यावर पालकांनी दिलेल्या तक्रारीनुसार रेवदंडा पोलिसांनी आरोपी आर्यन दीपक कोटकरविरोधात भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलीस उपनिरीक्षक एम.टी. शिंदे या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

## रायगडच्या समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांचे उधाण

**अलिबाग : प्रतिनिधी**

नाताळच्या सुट्ट्या तसेच थर्टीफस्ट व नववर्षाचे स्वागत करण्यासठी रायगड जिल्ह्यात मोठ्या संख्येने पर्यटकांची गर्दी उसळली आहे. शनिवार, रविवार या वीकेण्डला तर पर्यटकांना उधाणच आले. विशेषकरून पर्यटकांची पहिली पसंती समुद्र किनाऱ्यांना असल्याने अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन तालुक्यातील बीच पर्यटकांनी भरून गेले.

सलग सुट्ट्यांमुळे अलिबागमधील आवास, सासवणे, किहीम, वरसोली, अलिबाग, आक्षी, नागाव, चौल आणि रेवदंडा; मुरूड तालुक्यातील काशिद, नांदगाव, मुरूड आणि फणसाड; तर श्रीवर्धनमधील दिवेआगर, हरिहरेश्वर, श्रीवर्धन आणि आरावी बीच येथे शेकडो पर्यटक दाखल झाले. कर्जत तालुक्यातील गारेगार माथेरानही हाऊसफुल्ल झाले आहे.

समुद्र किनाऱ्यांवर फिरून झाल्यावर पर्यटक सागर स्नानाचा आनंद घेत आहेत. एटीव्ही राईडबरोबरच बनाना राईडस्, जेटसकी, पॅरासेलिंग यांचा थरार अनुभवत आहेत. बच्चेकंपनी घोडागाडी, उंटसवारी करण्यात दंग असल्याचे दिसून आले.

दरम्यान, पर्यटकांच्या आगमानामुळे स्थानिक व्यावसायिकांना चांगला रोजगार उपलब्ध झाला. खासकरून हॉटेल, लॉजेस, बोटींग व्यावसायिक, स्टॉलधारक, नारळपाणी विक्रेते यांचे व्यवसाय तेजीत असल्याचे पहायला मिळत आहे. दोन दिवसांनी वर्षाअखेर असणार आहे. त्यासाठी पर्यटकांनी आधीच बुकींग केली आहे. थर्टीफर्स्टला पार्टी करून ते नववर्षाचे जोरदार स्वागत करणार आहेत.



## माजी खासदार सतीश प्रधान यांचे निधन

**ठाणे : प्रतिनिधी**



शिवसेना नेते, ठाणे महापालिकेचे प्रथम नगराध्यक्ष, प्रथम महापौर आणि माजी खासदार सतीश प्रधान यांचे रविवारी (दि. २९) ठाण्यात वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते.

सतीश प्रधान यांनी राज्यसभा सदस्य, संसदीय गटनेते आणि केंद्रातील विविध समित्यांवरही काम केले. राजकारणासोबतच शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रात त्यांनी योगदान दिले. गेल्या काही महिन्यांपासून ते आजारी होते. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी १० वाजता ठाण्यातील जवाहरबाग स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## भारताची कोनेरू हम्पी नवी वर्ल्ड चॅम्पियन!

### रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतपद पटकावले

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

काही दिवसांपूर्वीच भारताच्या १८ वर्षीय डी गुकेशने बुद्धिबळाच्या इतिहासातील सर्वात तरुण वर्ल्ड चॅम्पियन बनून इतिहास रचला होता. आता बुद्धिबळपटू कोनेरू हम्पीने पुन्हा एकदा या खेळात देशाचे नाव रोशन केले आहे. कोनेरू हम्पीने रॅपिड बुद्धिबळ वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२४चे विजेतेपद रविवारी (दि. २९) पटकावले. अंतिम सामन्यात तिने इंडोनेशियाच्या इरेन सुकंदरचा पराभव करून ही ऐतिहासिक कामगिरी केली.

रॅपिड बुद्धिबळ वर्ल्ड चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावण्याची हम्पीची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी तिने २०१९मध्ये जॉर्जियामध्ये हे विजेतेपद पटकावले होते. या फॉरमॅटमध्ये दोनदा विजेतेपद पटकावणारी कोनेरू हम्पी आता चीनच्या जू वेनजुननंतर केवळ दुसरी खेळाडू ठरली आहे.

३७ वर्षीय कोनेरू हम्पीने ११ फेऱ्यांमध्ये एकूण ८.५ गुण मिळवून विजेतेपद पटकावले. बुद्धिबळातील तिची कारकीर्द चमकदार राहिली आहे. तिने २०१२मध्ये रशियातील मॉस्को येथे कांस्यपदक आणि २०२२मध्ये उझबेकिस्तानातील समरकंद येथे रौप्यपदक जिंकले होते. सातत्य आणि उत्कृष्ट कामगिरीमुळे ती जगातील सर्वोत्तम बुद्धिबळपटूंपैकी एक बनली आहे.



## प्रधानमंत्री मातृ वंदना योजना

# ३५ लाख २६ हजार लाभार्थी

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

गर्भवती माता व त्यांच्या नवजात बालकांचे तसेच स्तनदा मातेचे आरोग्य सुधारावे व त्यांना सकस पोषण आहार मिळून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी, या हेतूने राज्यात गेली अनेक वर्षे राबविण्यात येत असलेली प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचे महत्व खर्या अर्थाने जीवनदायी म्हणावे लागेल. या योजनेचा आतापर्यंत ३५ लाख २६ हजार २६५ मतांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

गरोदरपणात आणि बाळंतपणात महिलांना आरोग्य सेवा-सुविधा आणि प्रोत्साहनाच्या माध्यमातून कुपोषणाचा प्रभाव कमी करणे आणि माता व बाल आरोग्य सुधारणे हा प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा उद्देश आहे. या योजनेंतर्गत पहिल्या अपत्यासाठी दोन हप्त्यांत ५,००० रुपयांची मदत दिली जाते. पहिला हप्ता ३,००० रुपयांचा असून त्यासाठी राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या शासकीय आरोग्य केंद्रात गर्भधारणेची नोंदणी आणि शेवटच्या मासिक पाळीच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या आता किमान एक प्रसूतीपूर्व तपासणी करणे आवश्यक आहे.

दुसरा हप्ता २,००० रुपये असून त्यासाठी बाळाची जन्म नोंदणी आणि बालकास बीसीजी, ओपीव्ही झीरो, ओपीव्ही ३ मात्र, पेन्टाव्हॅलेन्टलसीच्य ३ मात्रा अथवा पर्यायी लसीकरणाचे प्राथमिक चक्र पूर्ण करणे आवश्यक आहे. दुसरे अपत्य मुलगी असल्यास तिच्या जन्मानंतर एक रकमी ६,००० रुपये मदत दिली जाते. त्यासाठी जन्म दाखला असणे आवश्यक असून बालकाचे पेन्टा ३ पर्यंतचे (१४ आठवडे) लसीकरण पूर्ण झालेले असणे आवश्यक आहे. प्रारंभ करण्यात आला. या योजनेंतर्गत २०१७ ते मार्च २०२४ कालावधीत ३५,२६,२६५ लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे.

### अशी आहे लाभार्थ्यांची आकडेवारी

***जानेवारी २०२४ ते नोव्हेंबर २०२४ दरम्यान राज्यातील २,८२,२३९ लाभार्थ्यांनी लाभ घेतला असून, सन २०२०-२१ मध्ये ५,४७,२१९, सन २०२१-२२ मध्ये ६,०९,९२१, सन २०२२-२३ मध्ये ५,२१,७५० आणि सन २०२३-२४ मध्ये १,१९,८२८ लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहेत.***

केंद्र शासनाच्या १४ जुलै २०२२ रोजीच्या पत्रानुसार प्रधानमंत्री मातृ वंदना योजना दोन ही नव्या स्वरुपात देशात लागू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये पूर्वी केवळ पहिल्या अपत्यासाठी लाभ मिळत असे, मात्र आता नवीन संकल्पनेनुसार १ एप्रिल २०२२ नंतर दुसरे अपत्य मुलगी जन्माला आल्यानंतरच्या लाभार्थीचा देखील या योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. नवीन निकष पात्र लाभार्थी शोधून आशा किंवा अंगणवाडी सेविका त्यांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थीची ऑनलाइन पीएमएमव्हीवाय सॉफ्टवेअरमध्ये लाभार्थी नोंदणी केली जाते. लाभार्थी पहिल्या खेपेचा असेल तर दोन टप्प्यात फॉर्म भरला जातो. दुसऱ्या जिवंत अपत्याच्या वेळी मुलगी असणारे लाभार्थी असतील त्यांचे एकच टप्प्यात फॉर्म भरला जातो. याशिवाय पात्र लाभार्थी पोर्टलवर स्वतः लाभासाठी नोंदणी करू शकतात.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थी खालीलपैकी किमान एक गटातील असणे आवश्यक आहेत.ज्या महिलांचे निव्वळ कौटुंबिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्ष कमी आहे तसेच अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा ज्या महिला ४० टक्के किंवा पूर्णतः दिव्यांग आहेत. बीपीएल शिधापत्रिका धारक महिला. आयुष्मान भारत अंतर्गत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत महिला लाभार्थी. इ- श्रम कार्ड धारण करणाऱ्या महिला. किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी महिला शेतकरी. मनरेगा जॉब कार्ड घेतलेल्या महिला. गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशा कार्यकर्ती. अन्नसुरक्षा कायदा २०१३ अंतर्गत रेशनिंग कार्ड धारक महिलांना या योजनेचा लाभ मिळतो असे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले. प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय,उपजिल्हा रुग्णालय,जिल्हा रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे रुग्णालय आदी ठिकाणी गरोदर मातांची मोफत तपासणी व प्रसूती होते.

## श्रीवर्धनमध्ये गाडीच्या बोनेटवर बसून पर्यटकाची स्टंटबाजी



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व मनसोक्त आनंद घेण्यासाठी राज्यभरातील पर्यटक मोठ्याप्रमाणात श्रीवर्धन तालुक्यात दाखल झाले आहे. काही पर्यटक गाडीच्या बोनेटवर बसून मोबाईल घेऊन व्हिडीओ बनवत आहेत, या धाडसी व धोकादायक कृत्यामुळे पर्यटक आणि चालक दोघांनाही जिवितहानीचा धोका होऊ शकत असल्याने स्ट्ंटबाजी करणाऱ्या पर्यटकावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे

गाड्यांच्या बोनेटवर बसून मोबाईलवर संटबाजी करणाऱ्या या पर्यटकांचे धाडस थोडंही कमी होत नाही. यातून गाडीच्या नियंत्रणावर परिणाम होऊ शकतो, विशेषतः अचानक ब्रेक लागल्यास अथवा गाडीच्या स्टेअरिंगवर अनियंत्रित वर्तन झाल्यास मोठे अपघात होऊ शकतात.

श्रीवर्धनमध्ये घडत असलेल्या या प्रकारच्या घटनांमुळे नागरिक आणि पर्यटकांच्या सुरक्षेची चिंता निर्माण होत आहे. संबंधित विभागांनी तात्काळ कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. ज्या प्रकारे पर्यटक गाड्यांच्या बोनेटवर बसून अशा संटबाजी करत आहेत, त्यामुळे भविष्यात गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सोशल मीडियावर श्रीवर्धनमधील काही व्हिडीओ आणि फोटो वायरल झाले आहेत, ज्यामुळे या धाडसी कृत्याचे प्रमाण समोर आले आहे. या घटनांमध्ये परदेशी पर्यटक आसल्याचे चित्र पाहायलाच मिळत आहे. हे मनोरंजन असू शकते, परंतु यामुळे तुम्हाला आणि इतरांना जीवितहानीचा धोका देखील होऊ शकतो श्रीवर्धनमध्ये अशी घटना थांबवली नाही तर भविष्यात गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही

श्रीवर्धन पोलिस आणि रस्ते सुरक्षा विभागाने तात्काळ दखल घेउन असल्या घटनांवर कठोर कारवाई केली पाहिजे. पर्यटकांनी या प्रकारे धाडसी व अनावश्यक वर्तन थांबवून शिस्त पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.अशी मागणी श्रीवर्धन तालुक्यातील नागरिक करीत आहे.

# वर्षभरात गोळा केला २०० टन कचरा; २०२४ची सांगता स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

धर्मेश बराई यांनी रोहन भोसले व श्रीराम शंकर या दोन मित्रांसह नवी मुंबईत स्वच्छता मोहिम सुरु केली होती. दर आठवड्याला ही स्वच्छता मोहीम आखली जात होती. त्यात हळूहळू नागरीक जोडले गेले . या रोपाचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे. २९ डिसेंबर रोजी वर्षातील अखेरची स्वच्छता मोहीम पार पडली. वर्षभरात झालेल्या ५२ पेक्षा जास्त स्वच्छता मोहिमांत स्वच्छता दुतांकडून तब्बल २०० टन कचरा कांदळवन स्वच्छता मोहिमेत गोळा करण्यात आला.नवी मुंबईला खाडी किनारा लाभला आहे. या खाडी किनाऱ्यावर कांद्ळवने शहराची, किनाऱ्याची सुरक्षा करत असतात. या कांद्ळवनात सातत्याने इतर शहरांचा कचरा वाहून येत असतो व अडकत असतो. त्यामुळे





## धर्मेश बराईने सुरू केलेल्या मोहिमेचे होतेय कौतुक

या कांदळवनात सातत्याने कचऱ्याचे ढीग जमा होत असून, राहणाऱ्या जलचारांना धोका पोहोचत असतो. ही बाब लक्षात घेत नेरूळ येथील पर्यावरण प्रेमी तरुण धर्मेश बराई व त्याच्या मित्रांनी कांदळवन स्वच्छतेचा निश्चय केला. आज मितीस ६०० टनांपेक्षा जास्त कचरा उचलण्यात आला आहे.

१५ ऑगस्ट २०२० रोजी सुरू झालेल्या मँग्रोव्हज क्लीनअप ड्राइव्हमध्ये नवी मुंबईतील मँग्रोव्हजमधून ६०,००० पेक्षा जास्त स्वयंसेवकांनी एकत्रितपणे सहभाग नोंदवला आहे. ६०० टनांपेक्षा जास्त नष्ट न होणारा कचरा काढला आहे. स्वच्छ्ता मोहिमेस सुरुवात केल्यावर दर रविवारी धर्मेश व त्याचे मित्र कांदळवनातील कचरा साफ करू लागले. हळूहळू अनेक व्यक्ती व समाजिक संस्थांची साथ धर्मेश व त्याच्या मित्रांना मिळाली. धर्मेश व त्याचे मित्र नवी मुंबई पालिकेतील अधिकाऱ्यांना भेटले. नवी मुंबई पालिकेची साथ देखील धर्मेश याला सध्या मिळत आहे.धर्मेशने एन्वयर्नमेंट लाईफ ही संस्था स्थापन केली आहे. धर्मेश व त्यांचे सहकारी दर रविवारी सकाळी ही मोहीम नेरुळ करावे गावाजवळील कांदळवन क्षेत्रात राबवतात. तो कचरा बाजूला जमा केला जातो. दुपारी पालिकेची कचरा गाडी हा कचरा उचलून नेते. थंडी, उन, याला न थकता, न थांबता, न कंटाळता ही मोहीम सुरु आहे. कोणीही आले नाही तरी धर्मेश न चुकता आपली मोहिम फत्ते पाडत असतो.

### कांदळवन संवर्धनासाठी आलेले मान्यवर

*संजय कुमार चीफ कमिशनर इनकम टॅक्स मुंबई व सर्व अतिरिक्त आयुक्त राजकुमार राव हिंदी चित्रपट अभिनेता, सुनील ग्रोव्हर हिंदी चित्रपट अभिनेता आयआरएस समीर वानखेडे ,ओमकार भोजने -मराठी अभिनेता अस्मित पटेल डॉ बाबासाहेब राजळे, तत्कालीन नवी मुंबई पालिका अधिकारी लविस टारेन्स -सिंगर विविध कंपनी चे CEO , डायरेक्टर, कॉर्पोरेट कंपनी शाळा, कॉलेज विद्यार्थी, विविध संस्था .*

### इतर शहरातील कचरा नवी मुंबईसाठी त्रासदायक

*नवी मुंबई हे खाडी किनारी वसलेले शहर आहे. त्यामुळे तितकेच कांदळवन क्षेत्र या शहराला लाभलेले आहे. मात्र या कांदळव् नांचा ऱ्हास होऊ लागला आहे. दुसरीकडे मुंबई, उरण, पनवेल व ठाण्याच्या खाडीतून कचरा नवी मुंबई कांदळवनांत अडकत आहे. त्यामुळे सजीव सृष्टीचे नुकसान होत आहे. त्या त्या पालिकांनी देखील यावर बंधने घालणे आवश्यक आहे.*

त्याला मँग्रोव्ह फाउंडेशन, नवी मुंबई महानगरपालिका, स्थानिक एनजीओ, समुदाय कार्यकर्ते, महाविद्यालयीन गट, कॉर्पोरेट हाऊसेस, विविध संस्था आणि रहिवाशी गटांचा पाठिंबा मिळाला आहे. पर्यावरणाबाबत काम करणाऱ्या समाजातील हिरोंना केंद्राच्या जलशक्ती मंत्रालयाकडून वॉटर हिरोने गौरविले जाते. यंदाचा हा पुरस्कार धर्मेश बराई यास् मिळाला आहे.

## माणगाव शहरातील वाहतूक कोंडी सुटण्याच्या मार्गावर

### मोर्बा रोड कालवा ते महामार्ग बाह्यवळण मार्गाचे काम सुरू

**माणगाव : बातमीदार**

माणगाव शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मोर्बा रोड लगतच्या कालव्यामार्गे ते मोतीराम प्लाझा असा जोड रस्त्याचे काम सुरु करण्यात आल्याने सुट्टी दिवसात शहरातील बाजारपेठेत होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार आहे.

या मार्गाच्या रुंदीकरणासाठी ६० लाख रुपये मंजूर झाले आहेत. हे रुंदीकरण आता सुरू झाले आहे. मुंबई कडून म्हसळा, श्रीवर्धन तालुक्यातील प्रवासी या बाह्यवळण मार्गाचा लाभ घेत आहेत. या रस्त्यामुळे कोकण आणि मुंबई या भागातील प्रवाशांना वाहतूक कोंडीचा त्रास होणार



नाही. त्यामुळे पोलिसांवरील ताण कमी होईल. प्रवासी आणि नागरीकांना मोठया प्रमाणात दिलासा मिळेल.

याचबरोबर महामार्गावरील कळमजे फाटा ते मुगवली असा बाह्यवळण रस्त्याचे काम ही प्रगतीपथावर असून तो लवकरच पूर्ण होणार आहे. नगरपंचायत तर्फे साईनगर कालवा, भादाव, विंचवली ते महामार्ग हा अंतर्गत रस्ता करण्यात येणार आहे. हे तीन मार्ग पुर्ण झाल्यानंतर शहरातील बाजारपेठेत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार नाही. त्यामुळे पोलिसांवरील मानसिक ताण कमी होईल आणि प्रवास सुखकर होईल.

## टेम्पोच्या धडकेत वृद्ध महिलेचा मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीजवळील अन्नपूर्णा चौकामध्ये टेम्पोने पायी जाणाऱ्या भीवराबाई चौधरी या ६८ वर्षांच्या महिलेला धडक दिली. गंभीर दुखापत झाल्यामुळे महिलेचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला आहे.


अपघाताप्रकरणी टेम्पोचालक शरथ नटराजनविरोधात एपीएमसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. नटराजन हा केरळवरून टेम्पो घेऊन नवी मुंबईत आला होता. दुपारी दीड वाजता वाशीकडे जाणाऱ्या मार्गिकेवर अन्नपूर्णा चौकात त्याने महिलेला धडक दिली. अपघातामध्ये महिलेला गंभीर दुखापत झाली होती. कंबरेला व पायांनाही दुखापत झाल्याने तिला उपचारासाठी रिक्षामधून नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयात नेले; परंतु उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी एपीएमसी पोलिसांनी चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## अलिबागकडे पर्यटकांचा वाढता कल

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सतत आलेल्या सुट्या मुळे अलिबाग, मुरूडकडे पर्यटकांचा प्रचंड कल आहे. हजारोंच्या संख्येने वाहने वडखळ बाजूने अलिबाग कडे आली आहेत, मात्र वाहतुकीची कोंडी टाळण्यासठी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे हे स्वतः रस्त्यावर उतरून त्यांच्या समवेत वाहतुक पोलीस तसेच होमगार्ड यांनी देखील कंबर कसली आहे. त्यामुळे या वेळी फारसी वाहतूक कोंडी झालेली दिसून येत नाही.

पोयनाड, पेझारी येथे कोंडी झाल्यास देहेन श्रीगाव मार्गे पेझारी असा पर्यायी मार्गदेखील पोयनाड पोलिस ठाणे तसेच वाहतूक विभाग



यांनी केलेला ट्रफिक सुरळीत पणे चालू राहण्यासाठी अश्या प्रकारे उपाय योजना केल्या आहेत. स्थानिक सामाजिक कार्यकर्तेदेखील पोलिसांना सहकार्य करित आहेत. वाहतूक विभागाचे विशेष कौतुक होत आहे.

## सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी श्रीवर्धनमध्ये पर्यटकांची गर्दी

### वाहतूक नियमनासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त


**श्रीवर्धन : प्रतिनिधी बातमीदार**

डिसेंबर महिन्यातील शेवटचा शनिवार, रविवार तसेच सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी श्रीवर्धन मध्ये पर्यटकांचा अलोट सागर उसळलेला पाहायला मिळाला. श्रीवर्धन शहरामध्ये पर्यटकांबरोबरच शालेय विद्यार्थ्यांच्या व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहली खूप मोठ्या प्रमाणावर येत आहेत. सहलीच्या बस गाड्या श्रीवर्धन शहरामध्ये शिरल्यानंतर शहरामध्ये प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या ठिकाणची नगरपरिषद ब्रिटिशकालीन असल्यामुळे रस्ते जेमतेम १२ ते १४ फूट रुंदीचेच आहेत. त्यामुळे दोन मोठी वाहने पास होत नाहीत. त्यासाठी वाहतुकीचे योग्य नियमन करण्यासाठी श्रीवर्धन पोलिसांनी विविध प्रकारे पावले उचलण्याचे पाहायला मिळत आहे.

मोठ्या बसेस त्याचप्रमाणे एसटी बसेस व टेम्पो ट्रॅव्हलर्स यांना श्रीवर्धन मध्ये प्रवेश करण्याच्या अगोदरच कमानीच्या बाहेर वाहने पार्किंग करण्यासाठी पोलिसांकडून सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती मोठ्या प्रमाणात येणाऱ्या पर्यटकांच्या चार चाकी गाड्या उभ्या करण्यासाठी र.ना. राऊत विद्यालयाच्या पटांगणाचा वापर श्रीवर्धन पोलिसांकडून करण्यात येत आहे. पोलिसांकडून पार्किंगसाठी विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात असल्या तरी, श्रीवर्धन शहरातील मठाचा गवंड, अवधूत मंदिर परिसरात देखील मोठ्या प्रमाणात वाहने उभी केल्याचे पाहायला मिळत होते.

नाताळच्या सुट्ट्यांचा हंगाम असल्यामुळे पर्यटकांनी श्रीवर्धन तालुक्यातील सर्वच समुद्र किनाऱ्यांना पसंती दिली आहे. श्रीवर्धन बरोबरच हरिहरेश्वर, दिवेआगर व आरावी या ठिकाणी देखील समुद्रकिनाऱ्यावरती खूप मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळाली. पर्यटकांच्या प्रचंड गर्दीमुळे या ठिकाणी असणारे हॉटेल व्यवसायिक, त्याचप्रमाणे लॉजिंग बोर्डिंगचे मालक, रिसॉर्टचे मालक यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण पसरलेले पाहायला मिळत आहे. श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावरती प्रत्येक शनिवारी व रविवारी सायंकाळी ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात येत असून यामध्ये येणाऱ्या पर्यटकांना तसेच स्थानिक गायक यांना देखील गाण्याची संधी देण्यात येत आहे.

श्रीवर्धनचा स्वच्छ व सुंदर, निसर्गरम्य असा समुद्रकिनारा येणाऱ्या पर्यटकांना भुरळ घालत असून सध्या वातावरण व हवामान देखील अल्हाददायक आहे. पर्यटक श्रीवर्धन तालुक्यात मोठ्या प्रमाणावर आल्यामुळे पर्यटन व्यवसायावरती अवलंबून असणाऱ्या अनेक घटक व्यावसायिकांना देखील मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होताना दिसत आहे. रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे व श्रीवर्धनच्या आमदार नामदार अदिती तटकरे यांच्या प्रयत्नाने श्रीवर्धन या ठिकाणी पर्यटन वाढीसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर देखील चांगल्या प्रकारे सुशोभीकरण करण्यात आलेले आहे.



## निवडक

### पार्क केलेल्या रिक्षाची चोरी

**पनवेल :** शहराजवळील अमरधाम इंडस्ट्रीज येथील गुरुदेव पॅकेजिंग येथे उभी करून ठेवलेली रिक्षा अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. सुधाकर म्हात्रे यांनी त्यांची ५० हजार रुपये किंमतीची बजाज कंपनीची रिक्षा (एमएच-४६-एसी-३५०३) ही गुरुदेव पॅकेजिंग प्लॉट नं.२७ येथे उभी करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने रिक्षा चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### करंजाडेत सोन्याचे दागिने चोरले

**पनवेल :** करंजाडे सेक्टर आर फोर येथील घरात येऊन अनोळखी व्यक्तीने ७६ हजार रुपये किमतीचे सोन्याची रिंग आणि सोन्याचा कडा चोरल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सेक्टर आर फोर, करंजाडे येथे राहणाऱ्या फिर्यादी यांनी टेबलवर सोन्याची रिंग आणि सोन्याचा कडा ठेवला होता. त्यांनी रिंग आणि कडा पाहिले असता त्यांना ते दिसून आले नाही. अनोळखी व्यक्तीने ते चोरून नेले.

### पनवेलमध्ये क्रांतिवीर करंडक

**पनवेल :** शिवक्रांती सामाजिक संस्था व शब्दवाहीनी अकॅडमी आयोजित राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त क्रांतिवीर करंडक २०२५ आयोजन करण्यात आले आहे. राज्यस्तरीय खुली वक्तृत्व स्पर्धा रविवारी (दि.१२) जानेवारी २०२५ रोजी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे. सर्व स्पर्धकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभाग घ्यावा व अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी पंकज पांडुळे ८१०४६८९८८०, अविनाश भोईर ९७६४८८३११९ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### टेलरिंग व नर्सिंग असिस्टंट प्रशिक्षण

**उरण :** आस्था सोशल फाउंडेशन यांच्या वतीने उरण येथे मोफत टेलरिंग व नर्सिंग असिस्टंट प्रशिक्षण शिबिर घेण्यात येणार आहे. हे शिबिर तीन महिने कालावधीचे असेल. कौशल्यावर आधारित प्रशिक्षण, व्यक्तिमत्व विकास, संभाषण कौशल्य, प्रशिक्षण दरम्यान शैक्षणिक साहित्य मोफत, प्रशिक्षणा नंतर शासनमान्य प्रमाणपत्र, रोजगार उपलब्ध सहकार्य आदी प्रशिक्षणाची वैशिष्ट आहेत. लाभार्थी किमान १० वी पास, वय १८ ते ४० वर्षे, वार्षिक उत्पन्न २.५ लाख पेक्षा कमी असावे. त्याचप्रमाणे आधार कार्ड, रेशनिंग कार्ड, मार्कशीट किंवा शाळा सोडल्याचा दाखला व दोन फोटो आदी आणावेत. अधिक माहितीसाठी ८५३०१६४१६९, ९०११८५००६९ साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बांधकाम व्यावसायिकाची फसवणूक करणारा गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील नामांकित बांधकाम व्यावसायिक तुकाराम दुधे यांना केलेल्या ५५ लाख २९ हजार रुपयांच्या फसवणूक प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी अकोला बाळापूर येथे जावून आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत.

फजल रहेमान गुलाब नबीब अन्सारी याने त्याच्या मेसर्स साई अँश पाँड् ट्रान्सपोर्टिंग कंपनीला महाजनको पारस या औष्णिक ऊर्जा प्रकल्पामध्ये टेंडर मिळाले असून टेंडरच्या अनुषंगाने कंपनीने एकूण एक कोटी ८५ लाख ३९ हजार २०७ इतकी रक्कम भरलेली आहे असे तुकाराम दुधे यांना सांगितले. आणि तेवढ्या रकमेच्या महाजनकोच्या पावत्या दाखवून तुकाराम दुधे यांच्याकडून कंपनीमध्ये ३० टक्के भागीदार म्हणून ५५ लाख २९ हजार रुपये मे. साई अँश पाँड् ट्रान्सपोर्टिंग कंपनीच्या बँक खात्यावर स्वीकारली. त्यानंतर आरोपीने डिसेंबर २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये महाजनको मधून ४१९ रुपये दराने राखाडी विकत घेऊन ती पुढे ५४० रुपये या दराने विक्री करून एकूण नऊ हजार २४६ मॅट्रिक टन राखाडी विकली आणि दुधे यांनी गुंतवलेल्या रकमेवरती कमाई करून आणि तसे करण्यासाठी महाजनको कंपनीचे इंजिनियर यांनी खोट्या पावत्या, इतर कागदपत्रे बनवून देऊन त्याद्वारे दुधे यांचा विश्वास संपादन केला आणि गुंतवलेली रक्कम ५५ लाख २९ हजार रुपये आणि त्या बदल्यात कोणत्याही मोबदला न देता तुकाराम दुधे (रा. भारत गॅसजवळ, पनवेल) यांची फसवणूक केली.

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक सुनील वाघ, हवालदार अतुल देवकर व शिपाई दत्ता जाधव आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेतला असता हा आरोपी अकोला बाळापूर येथे असल्याचे समजून आल्याने त्या ठिकाणी जावून सापळा रचून या आरोपीला ताब्यात घेऊन पनवेल कोर्टात हजर करण्यात आले आहे.

## उघड्यावरील अन्न खाल्ल्याने दिघोड्यात पाच मुलांना विषबाधा

**उरण : बातमीदार**

दिघोडे बसस्थानका जवळील उघड्यावर विकला जाणारा शोरमा हा खाद्यपदार्थ मूलांनी खाल्याने पाच जणांना विषबाधा झाल्याची घटना शनिवारी (दि.२९) घडली आहे. त्यामुळे सदर मुलांच्या पोटात दुखायला लागले व उलट्या होऊ लागल्याने त्यांना तातडीने चिरनेर गावातील रवि क्लिनिक या रुग्णालयात दाखल करण्यात आले असता रुग्णालयातील डॉक्टर प्रकाश मेहता यांनी मूलांवर उपचार सुरू केले. ही विष बाधा सुरमा हा खाद्यपदार्थ खाल्याने झाला असल्याची माहिती सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.



अन्न व औषध प्रशासनाने पैशाच्या हव्यासापोटी उरण तालुक्याकडे दुर्लक्ष केल्याने आज शहरात व तालुक्यातील अनेक गावातील नाक्यांवर राजरोसपणे उघड्यावरील खाद्यपदार्थ परप्रांतीय नागरीक विक्री करत आहेत. त्यामुळे उघड्यावरील अन्न खाल्ल्याने अनेकांना उलट्या, पोटात दुखण्याची कारणे समोर येत आहेत. त्यातच शनिवारी (दि.२९) दिघोडे बस स्थानकाजवळील रस्त्यावर विकला जाणारा शोरमा हा खाद्यपदार्थ शुभम पाटील, शुभम ठाकूर, निशांत भगत, रोहन पाटील व एक लहान मुलगा यांनी खाल्ल्याने त्यांना पोटात दुखायला लागले तसेच उलट्या होऊ लागल्याने त्यांना तातडीने चिरनेर गावातील रवि क्लिनिक रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले.

रुग्णालयातील डॉ. प्रकाश मेहता यांनी रुग्णांवर उपचार सुरू केले, परंतु आज डॉ प्रकाश मेहता यांच्या तत्परतेने सदर रुग्णांचे प्राण वाचले आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी नागरीकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या उघड्यावरील विक्री करणाऱ्या अशा व्यवसायिकांवर तातडीने कारवाई करावी अशी मागणी रहिवाशांकडून केली जात आहे.

> **रुग्णांनी उघड्यावरील शोरमा हा अन्न पदार्थ खाल्ल्याने त्यांना फुड पॉयझन (अन्नातून विषबाधा) झाले आहे. त्याची प्रकृती चांगली आहे. नागरिकांनी विशेष करून लहान मुलांनी उघड्यावरील अन्न पदार्थ खाऊ नयेत.**
>
> **-डॉ. प्रकाश मेहता**



**पनवेल : गव्हाण गावच्या साक्षी आंग्रे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे चित्र रेखाटले होते. हे चित्र त्यांनी रविवारी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केले. या चित्राचे व कलेचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले. या वेळी टीआयपीएलचे आयटी मॅनेजर संदीप आंग्रे उपस्थित होते.**



**पनवेल : माजी नगरसेवक जगदीश गायकर यांनी वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत आशीर्वाद घेतले. या वेळी राजेंद्र साखरे, विजय गायकर, रमेश गायकर आदी उपस्थित होते.**

# कल्हे गावात आदिवासींसाठी साहित्य व सभागृह लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदिवासी विकास विभाग आणि न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत उरण मतदार संघातील कल्हे गावात आदिवासी लोककला साहित्याचे वाटप आणि सामाजिक सभागृहाचा लोकार्पण सोहळा शनिवारी (दि.२९) झाला.

आमदार महेश बालदी यांनी उरण विधानसभा मतदारसंघात गेल्या पाच वर्षात हजारो कोटींची कामे मतदार संघात करून उरणचा चेहरा बदलण्याचा प्रयत्न केला आणि म्हणूनच मतदारांनी पुन्हा एकदा त्यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना उरण विधानसभा मतदारसंघातून विजयी केले. आपले विजयात कर्नाळा विभागातील आदिवासी समाजाचा मोठा वाटा आहे, असे मत या कार्यक्रमा वेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ज्ञानेश्वर घरत यांनी व्यक्त केले.

कर्नाळा विभागातील कल्हे आदिवासी वाडीत सामाजिक सभागृह आणि नव्याने बांधण्यात आलेल्या अंगणवाडीचे लोकार्पण आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी विधानसभा निवडणुकीत उरण मतदार संघातून आमदार महेश बालदी हे दुसऱ्यांदा मतदार संघातून निवडून आल्याबद्दल त्यांच्या जाहीर सत्कार करण्यात आला. विधानसभेच्या निवडणुकीत मी आदिवासी समाजाला शब्द दिला आहे की कोणताही आदिवासी येणाऱ्या पाच वर्षात कुडाच्या घरात राहणार नाही आणि तो शब्द मी पाळणार अशी मी ग्वाही देतो कोणत्याही परिस्थितीत आदिवासी समाजाला लाईट असेल घरकुल असेल किंवा शासनाकडून मिळणारे सेवा मी आमदार म्हणून नक्की मिळवून देईन आणि यासाठी सरकार आणि आदिवासी समाजातील दुवा म्हणून भाजपच्या कार्यकर्त्यांनी काम केले पाहिजे आपली ती जबाबदारी आहे, असे मत आमदार महेश बालदी यांनी या कार्यक्रमावेळी व्यक्त केले. राज्याचे आदिवासी मंत्री येत्या काही दिवसांत आपल्या मतदारसंघात येत आहेत आणि ते आपली सुखदुःख जाणून घेण्यासाठी येत आहेत त्यांच्याकडून तुमच्यासाठी जास्तीत जास्त सेवा आणि सुविधा मिळवण्याचे काम मी करेल, असेही पुढे आमदार महेश बालदी यांनी म्हटले.





या लोकार्पण सोहळ्याला आमदार महेश बालदी, उत्तर रायगड जिल्हा भाजपा चिटणीस व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ज्ञानेश्वर घरत, केळवणे जिल्हा परिषद भाजपचे विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय टेंबे, भाजपचे कर्नाळा विभागीय अध्यक्ष चंद्रकांत पाटील, फैयाज बडे, साई ग्रामपंचायतचे माजी सरपंच विद्याधर मोकल, पंचायत समितीचे विभागीय अधिकारी विजय खामकर, कराडे माजी सरपंच विजय मुरकुटे, माजी सदस्य प्रफुल पाटील जितेंद्र पाटील विनोद पवार छोटू जुमलेदार, शैलेश पाटणे, माजी उपसरपंच शेखर कानडे, अभिजित टाकले, संतोष मोरे, गजानन शेळके, योगेश खामकर, सतीश कानडे, जीवन टाकले, कमलाकर टाकले, राम जंगम, नाना जंगम आदी उपस्थित होते.

# गव्हाण विद्यालयात दहावी व बारावीचे पालक मेळावे उत्साहात

## चेअरमन अरुणशेठ भगत यांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये फेब्रुवारी - मार्च २०२४ मध्ये प्रविष्ठ असणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे स्वतंत्र मेळावे विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांचे अध्यक्षतेखाली शनिवारी (दि.२८)झाले.

एस.एस.सी.आणि एच.एस.सी. बोर्ड परीक्षेला सामोरे जाण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्र परीक्षेमधील संपादणुकीचा आढावा घेत आपल्या कमतरता शोधून त्यावर अधिक ध्यानकेंद्री होण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना संबोधित करण्यात आले.



विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन आणि रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेतील संपादणुकी बरोबरच जीवनाच्या परीक्षेमध्ये देखील यशस्वी व्हायचे असेल तर गुणवत्तेबरोबरच सुसंस्कृत होणेही अपेक्षित असून विद्यार्थ्यांनी त्या दृष्टीने ही आपले जीवनाचरण करावे, असे प्रतिपादन केले.

या वेळी पुढे बोलताना, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहायाने अध्ययनसुलभता येते परंतु केवळ मोबाईलचा वापर न करता स्वतः च्या बौद्धिक क्षमताही विकसित कराव्यात असा मौलिक आणि मार्मिक सल्लाही त्यांनी दिला.

या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मेळाव्यासाठी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी तसेच रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, पालक, अध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक देवेंद्र म्हात्रे व उमेश पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे व माणिक घरत यांनी मानले.



**खारघर : आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सेक्टर १४ येथील मैदान मुलांना क्रिकेट खेळण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. या वेळी युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, भाजप शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल आदी उपस्थित होते.**



**उरण : शुद्धता माता चर्च येथे धर्मगुरू फादर मार्शल लोपीस यांच्या मार्गदर्शनाखाली नाताळ निमित्ताने प्रभू येशू ख्रिस्त यांच्या जन्माचा देखावा साकारण्यात आला आहे. रात्री विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे सेंट मेरीज कॉन्वेंट हायस्कूल येथेही नाताळ निमित्ताने प्रभू येशू ख्रिस्त यांच्या जन्माचा देखावा साकारण्यात आला होता. अनेकांनी तिथे दर्शन घेतले.**

## संपादकीय

# रायगडात पर्यटनाला बहर

सध्या मुलांना नाताळच्या सुट्ट्या पडलेल्या आहेत. त्यामुळे बच्चेकंपनीसह पालक फिरायला निघाले आहेत. पर्यटनासाठी निसर्गरम्य रायगड जिल्ह्याला पसंती दिली जात आहे. त्यामुळे हा जिल्हा पर्यटकांनी हाऊसफुल्ल झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. यातून स्थानिकांना रोजगार प्राप्त झाला आहे.

**मुंबई, ठाणे, पुण्यापासून जवळ असलेला रायगड जिल्हा विविध पर्यटनस्थळांमुळे प्रसिद्ध आहे. जिल्ह्यातील विस्तीर्ण समुद्रकिनारे, नारळी-पोफळीच्या बागा, गड-किल्ले, इतर ऐतिहासिक व धार्मिक स्थळे, पुरातन वास्तू, अभयारण्ये पर्यटकांना भुरळ घालतात. जिल्ह्यात अलिबाग, मांडवा, वसरोली, किहीम, नागाव, रेवदंडा, काशिद, मुरूड, दिवेआगर, श्रीवर्धन यांसारखे समुद्र किनारे आहेत. रायगड, कुलाबा, जंजिरा, कोर्लई, खांदेरी, सरसगड, कर्नाळा यांसारखे किल्ले आहेत. महड, पाली, नांदगाव, चिरनेर, कनकेश्वर, हरिहेरश्वर, चौल, शिवतरघळ अशी धार्मिक स्थळे आहेत. घारापुरी, कुडा, गांधारपाले, कोंढाणे, ठाणाळे या लेण्यादेखील आहेत. त्याचबराबेर माथेरान हे हिल स्टेशन आहे. अशा प्रकारे या जिल्ह्यात आल्यानंतर बरेच काही पहायला मिळते. त्यामुळे पर्यटक निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी येण्या-जाण्यास जवळ व सोयीच्या ठरणाऱ्या रायगड जिल्ह्याला पसंती देतात. सध्या जिल्हा पर्यटकांनी बहरला आहे. विशेषकरून अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन व माथेरान या पर्यटनस्थळी मोठ्या संख्येने लोक आले आहेत. तसे पाहिले तर एरव्हीसुद्धा पर्यटकांची पावले वीकेण्डला इकडे वळतात. आता तर पर्यटन हंगाम जोरात आहे. नाताळमुळे शाळा-महाविद्यालयांना सुट्ट्या पडल्या आहेत. गेल्या काही वर्षांपासून दिवाळीच्या सुट्ट्यांनंतर नाताळच्या सुट्ट्यांमध्ये पर्यटक मोठ्या प्रमाणात रायगडात येतात. हे पर्यटक समुद्रस्नानाचा आनंद घेतात. वेगवेगळ्या वॉटरस्पोर्ट यात बनाना राईडस्, जेटसकी, पॅरासेलिंगचा थरार अनुभवतात, तर लहान मुले उंट सवारी, घोडागाडीमध्ये खुश होऊन जातात. जिल्ह्यात होणाऱ्या पर्यटनामध्ये शैक्षणिक सहलींचाही समावेश असतो. घाटमाथ्यावरील अनेक शाळांच्या सहली इथला निसर्ग विशेषत: बीच पाहण्यासाठी दरवर्षी आवर्जून येत असतात. विद्यार्थ्यांसह शिक्षकवर्ग मुरूडमध्ये डेरेदाखल होतात. तेथील जंजिरा किल्ला पाहण्यासाठी फेरीबोटीने जावे लागते. हा प्रवास मस्त असतो. बोटीतून जाऊन किल्ला पाहण्याची मजा काही औरच. मुलांसह मोठेही यामध्ये हरखून जातात. पर्यटक मोठ्या संख्येने आल्याने पर्यटन व्यवसायाला चांगले दिवस आले आहेत. यातून स्थानिकांना रोजगार मिळाला आहे. याबरोबरच दोन दिवसांनी थर्टीफर्स्ट म्हणजेच वर्षाअखेर व नववर्षाच्या स्वागतासाठी लोक येणार आहेत. त्यामुळे हॉटेल, लॉजेस बुक झालेली आहेत. याशिवाय घरगुती कॉटेजमध्ये राहून खास आगरी, कोकणी पद्धतीच्या जेवणावर बाहेरून आलेली मंडळी ताव मारत आहेत. एकूणच पर्यटन व्यवसाय तेजीत आहे, परंतु लोकांचा मोठ्या प्रमाणात लोंढा आल्याने वाहतूक कोंडी, अपघाताच्या घटनाही घडत आहेत. काही ठिकाणी रस्ते अरुंद असल्याने असे प्रकार होत आहेत. अशा वेळी प्रशासन, पोलीस आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत. पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अवजड वाहतूक बंदी, कडक बंदोबस्त अशा अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. पर्यटक व स्थानिकांनीही दक्ष राहून कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता लक्ष ठेवले पाहिजे. नियम पाळून व काही गोष्टींचे भान बाळगून वावरल्यास सर्वांच्याच हितकारक ठरणार आहे.**

# पर्यटकांचे थर्टीफर्स्टसाठी हक्काचे स्थान म्हणजे कर्जत





**खबरबात**
विजय मांडे

कर्जत तालुका म्हणजे पर्यटकांना पर्वणीच आहे. जगप्रसिद्ध माथेरान हे थंड हवेचे ठिकाण, कोंढाणे येथील लेणी, ढाक, पेठ अशी अनेक ठिकाणे मुंबईकरांचे लक्ष वेधून घेतात. या तालुक्यात अनेक फार्म हाऊस आणि रिसॉर्ट आहेत. त्यामुळे उन्हाळ्यातही येथे येण्यासाठी अनेक जण उत्सुक असतात. तसेच पावसाळ्यात या तालुक्यात अगदी कुठेही गेलात तरी धबधबे दिसतात. वरणे गावनजीकचा धबधबा, जांबरूग येथील धबधबा, माथेरान घाटातील धबधबा हे धबधबे सुद्धा पर्यटकांना मोहित करतात. आता वर्ष अखेरीस थर्टी फर्स्ट मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. त्यासाठी मुंबई, पुणेच नव्हे तर राज्यातून पर राज्यातून हौशी, शौकीन कर्जतला हक्काने पसंती देतात.

यंदाच्या थर्टी फस्ट साठी माथेरान तसेच तालुक्यातील रिसॉर्टची बुकिंग फुल्ल झाली आहे. दोन तीन महिन्यांपूर्वीच हौशी पर्यटकांनी ही बुकिंग केली असल्याने आयत्या वेळी येणाऱ्यांना परत फिरावे लागत आहे. माथेरान मध्ये मजा करण्यासाठी अचानकपणे निघालेले पुण्याकडील येणाऱ्यांना खोपोली, कर्जत किंवा नेरळला मुक्काम करावा लागतो मग दुसऱ्या दिवशी माथेरानमध्ये रूमची व्यवस्था झाली तर मग ते माथेरान कडे कूच करतात अन्यथा त्यांना कर्जतच्या मिळेल त्या रिसॉर्टवर असेल त्या दरात रूम बुक करून दुधाची तहान ताकावर भागवण्या शिवाय पर्याय नसतो. माथेरानचे वाहन तळसुद्धा फुल्ल असते. त्यामुळे पर्यटक आपली वाहने घाट रस्त्यावर कडेला उभी करतात. यामुळे वाहतूक कोंडी होत असते.

कर्जत तालुक्यात विकएंडला यायचे म्हणजे अनेकांच्या पोटात गोळा येतो त्याचे कारण कर्जतच्या प्रवेशद्वारावर म्हणजे चार फाट्यावर होणारी वाहतूक कोंडी. ही वाहतूक कोंडी इतकी होते की, दीड - दोन किलोमीटर अंतरासाठी एक - दीड तास लागतो. त्यामुळे पर्यटकांबरोबरच स्थानिकांनाही त्याचा दर आठवड्याला फटका बसतो. एखादया रुग्णाला रुग्णवाहिकेतून नेताना त्याचा मृत्यू या वाहतूक कोंडीमुळे होऊ शकतो. अशी परिस्थिती उदभवते. या वाहतूक कोंडीमुळे अनेकांच्या लांब पल्ल्याच्या गाड्या प्रसंगी विमानेही चुकली आहेत. आता वाहतूक कोंडी म्हणजे कर्जतकरांसाठी नित्याचाच विषय झाला आहे. ३१ डिसेंबरला तर वाहतूक कोंडीमुळे रत्यांवर किती किलोमिटर लांब असेल हे सांगता येत नाही.

कर्जत तालुक्यात बाराही महिने पर्यटकांची गर्दी असते. वर्षा सहलीची टूम मध्यम वर्गीय मंडळींनी मागील दशकात सुरु केली. त्यावेळी लोणावळ्यात भुशी धरण आणि माळशेज घाट हिच त्यांची डेस्टिनेशन होती. मात्र कर्जत तालुक्यात असंख्य धबधबे असल्याने व लोकलने कर्जतला येणे स्वस्त व सुरक्षित असल्याने पर्यटक कर्जतच्या धबधब्यांवर येऊन वर्षा सहलीचा आनंद घेऊ लागली. उपनगरीय लोकल मधून सहज लक्ष जाणारा आषाणे येथील धबधबा पुढे वर्षा सहल प्रेमींचा सर्वाधिक आवडता धबधबा ठरला आहे. पर्यटकांची सर्वाधिक पसंती लाभलेल्या धबधब्यावर येण्यासाठी मुंबई मधून टूर आयोजित करण्या पर्यंत आषाणे धबधबा आपल्याकडे सर्वांना आकर्षित करण्यात यशस्वी ठरला आहे, मात्र अपघात होऊ लागल्याने धबधबे व धरणांवर जाण्यासाठी शासनाने बंदी घातल्याने पर्यटकांचा हिरमोड होत होता. यंदा बंदी नव्हती म्हणून पर्यटकांनी मनसोक्त आनंद घेतला.

कर्जत तालुक्यात माथेरान सारखे जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. त्याच बरोबर रायगड आणि पुणे जिल्ह्याच्या सीमेवर ढाक हे डोंगरावरील पठारावर आहे. माथेरानपेक्षा काही फूट उंच असलेले हे ठिकाण म्हणजे मिनी माथेरान म्हणून प्रसिद्धीस येऊ शकते. ढाक हे मिनी माथेरान म्हणून विकसित व्हावे यासाठी स्थानिकांबरोबरच काही मुंबईकरांनीही काही वर्षांपूर्वी प्रयत्न केला होता, मात्र राजकारण्यांची मानसिकता नसल्याने हे पर्यटन स्थळ विकसित झाले नाही. हे कटू सत्य आहे. ढाक हे मिनीमाथेरान म्हणून विकसित झाल्यास पुणे जिल्ह्यातून सुद्धा तेथे यायला सोपा मार्ग आहे. तसेच मुंबईकरांना कर्जतला येऊन अवघ्या सहा किलोमीटर अंतरावर येऊन या स्थळा कडे जात येण्यासारखे आहे. गौरकामत व वदप या गावांपासून ढाक पर्यंत घाट रस्ता केल्यास हे पर्यटन स्थळ विकसित होऊ शकते. म्हणजे एरव्ही पर्यटनाची आणि थर्टी फस्टची मजा येथेही घ्यायला मुंबई-पुणेकरांना आवडेल यात शंका नाही.


पूर्वी कर्जत तालुक्यातील जमिनी मुंबईकर शेतकऱ्यांनी विकत घेऊन फार्म हाऊस व रिसॉर्ट उभे केले आणि या रिसोर्टवर रखवालदार म्हणून जमिनीचे पूर्वीचे मालक राहू लागले. ही गोष्ट दुर्दैवी होती. आता शेतकऱ्यांच्या मुलांनी शिक्षण घेतले असल्याने आपल्या वडिलोपार्जित जमिनीवर स्वतः रिसॉर्ट उभारून मुंबईकर शेतकऱ्यांच्या बरोबरीने व्यवसायात उतरत आहेत. ही चांगली गोष्ट आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### हिवाळ्यात गाडी सुरू करण्यात अडचणी येतायत? हे करा...

हिवाळा सुरू झाला असून सध्या राज्यभरात कडाक्याची थंडी पडली आहे. या दिवसात आरोग्यासह वाहनांचीही खूप काळजी घ्यायला हवी. अनेकदा थंडीमुळे वाहनं सुरू करताना खूप त्रास होतो. अनेक वेळा लोक त्यात तासनतास घालवतात, त्यानंतरही वाहन सुरू होत नाही. तसे हे विशेषतः तेव्हा घडते, जेव्हा एखादे वाहन गॅरेजमध्ये किंवा घराच्या पार्किंगमध्ये महिन्यांपासून पडून असते. दीर्घकाळ वापर न केल्यामुळे अशा समस्या उद्भवतात. तुमचेही एखादे वाहन महिनोनमहिने बंद पडलेले आहे आणि ते क्षणार्धात चालू करायचे असेल तर यासाठी तुम्हाला जास्त वाट पाहण्याची गरज नाही. या टिप्सच्या मदतीने तुम्ही बरेच दिवस थांबलेले वाहन सुरू करू शकता.



**या टिप्स करा फॉलो**

**वेळेवर सर्व्हिसिंग** - ज्या गाड्यांची सर्व्हिसिंग वेळेवर होत नाही, अशा वाहनांना अधिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे सर्व्हिसिंग आवश्यक आहे. कारण इंजिनमध्ये वापरलेले इंजिन तेल जास्त वापरानंतर घट्ट होते आणि हिवाळ्याच्या हंगामात ते गोठण्याची शक्यता असते.


**इंधन तपासा** - गाडी सुरू करण्यात काही अडचण येत असेल तर सर्वप्रथम पेट्रोल तपासा. जास्त काळ वापर न केल्यास पेट्रोलचे बाष्पीभवन होते. सीएनजी कार सूरू करण्यासाठी त्यामध्ये पुरेसे पेट्रोल असणे अत्यंत आवश्यक आहे. यासोबतच सीएनजीवर चालवण्यासाठीही पेट्रोल आवश्यक आहे.

**गाडीची बॅटरी तपासा** - गाडीची बॅटरी आणि इंजिन प्रामुख्याने थंड हवामानात प्रभावित होऊ शकते, त्यामुळे गाडी सुरू करताना अनेक समस्या उद्भवू शकतात. बॅटरी जुनी असेल तर ती बदला, अन्यथा बॅटरीच्या सर्व केबल्स आणि त्यामधल्या पाण्याची पातळी तपासा.

**बोनेट उघडून तपासा** - पेट्रोल आणि सीएनजी असूनही एखादे वाहन सुरू होत नसेल तर सर्वप्रथम बोनेट उघडून बॅटरी तपासा. हिवाळ्यात जास्त वेळ गाडी न चालवल्यास बॅटरी आपोआप डिस्चार्ज होते. बोनेट उघडल्यानंतर बॅटरीला जोडलेल्या तारा एकदा तपासा. काही वेळा त्यात गंज लागल्याने वाहन सुरू होत नाही.

**टायर्सची काळजी घ्या** - प्रत्येक ऋतूत टायर्सची काळजी घेणे गरजेचे आहे. हिवाळ्यात टायर्समधील हवेचा दाब योग्य असला पाहिजे, कारण थंड वातावरणात आर्द्रतेमुळे रस्ते ओले राहतात आणि ओल्या रस्त्यावर घसरण्याची भीती वाढते. टायर खूप झिजले असतील तर ते बदलून घ्या.

# कविवर्य मंगेश पाडगावकर



**निमित्त**

'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे', 'भातुकलीच्या खेळामधली', 'शुक्रतारा मंद वारा' ही गाणी आणि प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं अगदी 'सेम' असतं, ही कविता म्हटली की आपल्या डोळ्यासामोर नांव येते ते म्हजे मंगेश पाडगावकरांची आज जयंती. त्यांचा जन्म वेंगुर्ले येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव केशव आत्माराम पाडगावकर. मंगेश पाडगावकरांच्या आई रखमाबाई त्यांना केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज ह्यांच्या कविता वाचून दाखवत असत. त्यामुळे बालवयातच पाडगावकरांना लय, छंद, वृत्त यांची जाण नकळत येत गेली. आपला मुलगा मोठा कवी व्हावा, असे आईचे स्वप्न होते. आईच्या काव्यप्रेमाची परिणती नवव्या-दहाव्या वर्षात पाडगावकरांच्या काव्यलेखनात झाली. पुढे मुंबईत त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण विल्सन हायस्कूलमध्ये व विल्सन कॉलेजमध्ये झाले. वा. ल. कुलकर्णींच्या अध्यापनाचा आणि सहवासाचा परिणाम संवेदनशील पाडगावकरांवर झाला. त्याचप्रमाणे भा.रा.तांबे, कुसुमाग्रज, बा.भ.बोरकर या सौंदर्यवादी कवींच्या काव्याचा प्रभाव पाडगावकरांवर पडला. १९४९ साली पुण्यात झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनात त्यांनी सादर केलेली 'करि माझ्या दीप युगाचा रे' ही कविता ऐकून विठ्ठलराव घाटे यांनी 'उद्याचा कवी' ह्या शब्दांत पाडगावकरांची प्रशंसा केली. पाडगावकरांचा 'धारानृत्य' हा पहिला संग्रह १९५० साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर पाडगावकरांची एकूण ४२ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. पाडगावकरांच्या स्वतंत्र काव्य निर्मितीला खरी सुरुवात 'जिप्सी' (१९५३) या संग्रहापासून झाली. पाडगावकरांच्या समग्र कवितेचे प्रामुख्याने भावकविता, राजकीय-सामाजिक विषयांवरील कविता व गीतकाव्य असे तीन टप्पे होतात. याशिवाय नाट्यकविता, बालकविता, उपहासपर कविता (वात्रटिका), गझल या स्वरूपाची काव्यरचना पाडगावकरांनी केली .

'निंबोणीच्या झाडामागे' (१९५६) ह्या पाडगावकरांच्या एकमेव लघुनिबंध-संग्रहातील लघुनिबंध काव्यानुभवाच्या जवळ जाणारे आहेत. एखादी निसर्गस्थिती किंवा मनोवस्था जेव्हा पाडगावकरांच्या हृदयाचा कब्जा घेते, तेव्हा त्यांची उदास, व्याकुळ आणि काव्यात्म भाववृत्ती लघुनिबंधातून प्रकट होते. काव्यात्म वृत्तीने व संवेदनशीलपणे केलेले लघुनिबंध-लेखन भावविवश, भाबडे वा कृत्रिम होत नाही.

दुबईमध्ये झालेल्या दुसर्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे पाडगावकर अध्यक्ष होते. २०१३ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. २००८ मध्ये त्यांना राज्यातील प्रतिष्ठेचा महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १९८० मध्ये त्यांच्या सलाम या कविता संग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला होता.

पाडगावकर यांनी 'गझल', 'विदुषक', 'सलाम' या काव्यसंग्रहातून राजकीय आशयाची व उपरोधिकपणा असलेली समाजातील विसंगतीवर प्रहार करणारी कविता केली. सत्तेच्या संपर्कात राहणार्या वर्गातील लोकांनी सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रातील माणसांचा केलेला मानभंग, मध्यमवर्गीयांमध्ये आलेली लाचारी, दांभिकता याबद्दल पाडगावकर यांच्या मनात संताप होता तो या कवितांमधून प्रभावीपणे व्यक्त झाला. १९६० नंतरच्या वास्तववार भेदकपणे प्रकाश टाकणारी पाडगावकर यांची कविता नवसमृद्ध वर्गाची, त्याच्या संवेदनाहीन मनाची चिरफाड करून वाचकांना अंतर्मुख करते. पाडगावकरांची कविता सादर करण्याची एक विशेष ढब होती. त्या ऐकताना श्रोते जसे खळखळून हसत तसेच मंत्रमुग्धही होत असत.

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : गाड्या पार्किंग करण्यासाठी समुद्र किनारी व्यवस्था झाल्याने पर्यटकांची चिंता मिटली आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

### तुम्ही चुकीच्या पद्धतीने बसताय का?

खुर्चीचा उंचीचा समतोल नसणे शरीराच्या नैसर्गिक स्थितीत अडथळा आणतो. त्यामुळे मणक्यावर अतिरिक्त ताण येतो. पाठीस आधार देणाऱ्या खुर्चीचा अभाव असल्यास कंबरेच्या वाकण्यावर विपरीत परिणाम होतो. तेव्हा आताच बदल करा.



**योग्य खुर्चीची वैशिष्ट्ये**

१. कमरेला आधार- खुर्चीत लंबर सपोर्ट असावा जो पाठीच्या खालच्या भागाला (लोअर बॅक) आधार देतो. यामुळे मणक्याचा नैसर्गिक एस आकार राखला जातो, ज्यामुळे पाठीचा ताण कमी होतो.

२. उंचीची योग्य मांडणी खुर्चीची उंची अशी असावी की तुमचे पाय जमिनीला नीट टेकतील आणि गुडघे ९० अंश कोनात असावेत.

टाचांवर अनावश्यक दबाव येणार नाही यासाठी फूटरेस्टचा वापर करता येईल.

३. आर्मरेस्टची व्यवस्था- खुर्चीच्या आर्मरेस्टची उंची योग्य असावी. त्यामुळे खांद्यांवर ताण येत नाही आणि हात आरामशीर राहतात.

४. स्विव्हल खुर्ची- फिरणारी खुर्ची- फिरणारी खुर्ची (स्विव्हल) वापरल्यास एका ठिकाणी वाकून पोहोचण्याची गरज कमी होते, ज्यामुळे कंबर दुखण्याचा धोका कमी होतो.

५. आधुनिक खुर्च्यांतील सुविधा- अर्गोनॉमिक ऑफिस खुर्च्यांमध्ये हेडरेस्ट, ॲडजस्टेबल बॅकरेस्ट, आणि घसरले न जाणारे सीट कुशन ही अतिरिक्त वैशिष्ट्ये उपलब्ध असतात.

**खुर्चीवर बसण्याची योग्य पद्धत**

ताठ बसणे : नेहमी पाठ ताठ ठेवा; खुर्चीवर पुढे वाकून बसणे टाळा. पाठीला आधार: खुर्चीच्या मागील भागाला पाठ पूर्णपणे टेकवा. पायांची स्थिती : पाय लटकवू नका; पाय जमिनीवर सरळ टेकवा. ब्रेक घ्या : सतत बसून काम करण्याऐवजी दर ३० मिनिटांनी २-३ मिनिटे उभे राहून स्ट्रेचिंग करा.

पाठीचे स्नायू मजबूत करण्यासाठी दररोज स्ट्रेचिंग करा- मांडी आणि कंबरेचे स्नायू बळकट करण्यासाठी साधे व्यायाम उपयोगी पडतात.

मॉनिटरची स्थिती - स्क्रीन डोळ्यांच्या सरळ पातळीवर ठेवा. स्क्रीन कमी उंचीवर असल्यास मान झुकवली जाते आणि पाठदुखी वाढते.

३. डेस्क सेटअप - टेबल खुर्चीच्या उंचीला साजेसे ठेवा, जेणेकरून तुमचे हात ९० अंश कोनात राहतील.

४. योगासने आणि ध्यान - शरीरातील ताणतणाव कमी करण्यासाठी योगासने आणि ध्यान फायदेशीर ठरते.

# माणगाव येथे रेल्वेगाड्या थांबवण्याची मागणी

## ◆ दिवा ते वीर मेमू रेल्वे सुरू केल्यास वाहतूक कोंडीतून सुटका

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने दररोज हजारो लोक माणगावला ये जा करीत असतात. त्यामुळे शहरात ठिकठिकाणी नेहमीच वाहतूकीची कोंडी होत असते. रेल्वे मंत्रालयाने लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्या माणगाव स्थानकात थांबविल्यास आणि दिवा ते वीर मेमू रेल्वे सुरू केल्यास मुंबई गोवा महामार्गावरील वाहतूक कोंडीतून सुटका होण्यासाठी निश्चितच मदत होईल.




रेल्वेच्या माणगाव येथे थांबणार्या गाड्यांना प्रवाशांचा मोठया संख्येने प्रतिसाद मिळत आहे. याचा रेल्वे प्रशासनाला दरवर्षी अर्थिक फायदा होत आहे. त्यामुळे माणगाव येथे सर्व रेल्वे गाड्यांना थांबे द्यावेत अशी मागणी माणगाव रेल्वे प्रवासी संघटनेचे सचिव सुरेश जैन यांनी खासदार सुनील तटकरे यांच्या कडे केली आहे.

माणगाव येथे दररोज वाहतूकीची कोंडी होत आहे. त्यामुळे प्रवासी आणि येथील नागरिकांना नेहमीच नाहक त्रास होत आहे. मुंबई गोवा महामार्ग रखडलेल्या अवस्थेत असल्याने अपघातात हकनाक बळी जात आहेत. माणगाव हे रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने दररोज हजारो पर्यटक, प्रवासी प्रवास करीत आहेत.भविष्यातील जिल्ह्याचे ठिकाण असल्याने येथे सर्व प्रकारच्या रेल्वे गाड्यांना थांबे द्यावेत अशी मागणी करण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी रोहा येथे पाच रेल्वे गाड्यांना थांबे सुनील तटकरे यांच्या माध्यमातून मिळाले आहेत. परंतु माणगाव रेल्वे स्थानकावर रेल्वे गाड्या थांबत नसल्याने प्रवाशांना हाल सोसावे लागत आहेत. माणगाव येथील रेल्वे गाड्यांना माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, तळा या विधानसभा मतदारसंघातील प्रवाशांचा मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. सर्व थांबणार्या रेल्वे गाड्यांना हाऊसफुल्ल प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे आणखी रेल्वे गाड्या थांबण्याची मागणी केली जात आहे.

खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून रोहा येथे मडगाव, संपर्क क्रांती, इंदोर, कोईम्बतूर आणि तिरूनेलवेली गाड्या थांबत आहेत. माणगाव येथील रेल्वे स्थानकात जनशताब्दी, मंगला, नेत्रावती, मत्स्यगंधा, कोकणकन्या, ऋषिकेश या एक्सप्रेस आणि इतर सर्व रेल्वे गाड्या थांबल्यास रेल्वे आणि प्रवाशांचा निश्चितच फायदा होऊ शकणार आहे. विशेषतः दिवा ते रोहा ज्या पद्धतीने रेल्वे सेवा सुरू केली आहे त्याप्रमाणे दिवा ते वीर मेमू रेल्वे दिवसातून तीन ते चार वेळा सुरू झाली तर माणगावच नव्हे तर रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल असा दावा प्रवासी संघटनेने केला आहे.

माणगाव येथील एसटी बस स्थानकातून दररोज शेकडो एसटी बस मुंबई आणि कोकणात जाणाऱ्या आहेत. एसटी बस उपलब्ध नसल्याने व माणगाव रेल्वे स्थानकावर दुपारी एकही रेल्वे थांबत नाही.त्यामुळे खासगी बस, वाहने यांचा वापर प्रवासी करतात . यामुळे मुंबई गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी होत असते. हे टाळण्यासाठी रेल्वे गाड्यांना थांबे द्यावेत अशी मागणी करण्यात आली आहे.

### प्रशासनाने कार्यवाही केल्यावर हजारो प्रवाशांना होणार लाभ

*दिवा ते वीर मेमू रेल्वे सुरू केल्यास महाड, मंडणगड, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, तळा येथील मिळू शकतो. रोहा ते वीर या रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण झाले आहे. त्यामुळे रेल्वे गाड्या सहजपणे वीरपर्यंत जाऊ शकतात. तेथे रेल्वे गाड्यांना थांबण्यासाठी रेल्वे ट्रॅकही उपलब्ध आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने कोकणातील प्रवाशांची हेळसांड थांबवून मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक कोंडीतून सुटका करावी, अशी मागणी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे केली आहे*

याबाबत खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले की, माणगाव येथे सर्व प्रकारच्या रेल्वे गाड्यांना थांबे देण्यासाठी प्रयत्नशील आहे. माणगाव येथील बायपासचे कामही लवकरच सुरू करण्यात येणार आहे. तसेच वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रखडलेला मुंबई गोवा महामार्ग पुर्ण होण्यासाठी रस्ते विकास बांधकाम मंत्री नितीन गडकरी यांच्या सहकार्याने वरीष्ठ पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. हा महामार्ग तातडीने सुरू करण्यासाठी युद्ध पातळीवर ठिकठिकाणच्या पुल, बायपास, मोर्या यांची काम सुरू करण्यात आली आहेत.




# शिरसे गावातील वारकरी परंपरा सर्वांना प्रेरणादायी -आमदार थोरवे



**कर्जत : प्रतिनिधी**

वारकरी मंडळींशी संवाद साधताना आतापर्यंत २६-२७ वर्षांपासून चालत आलेली शिरसे गावातील ही धार्मिक परंपरा गावकऱ्यांच्या अथक प्रयत्नांनी अधिक सशक्त झाली आहे. हा सोहळा दरवर्षी ग्रामस्थ मंडळीसाठी प्रेरणादायी असल्याचे आमदार महेंद्र थोरवे यांनी शिरसे गावातील अखंड हरिनाम सोहळ्यात सांगीतले

शिरसे गावातील अखंड हरिनाम सोहळा मध्ये दीपोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार महेंद्र थोरवे यांच्यासह ह.भ.प.राणे महाराज, ह.भ.प.लोभी महाराज, ह.भ.प. प्रवीण महाराज फराट तसेच माजी सरपंच आरती भोईर, माजी उप सरपंच मनीषा दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार महेंद्र थोरवे यांनी वारकरी मंडळी यांचेशी संवाद साधताना 'शिरसे गावाने वारकरी परंपरेचा प्रचार करत धार्मिक एकतेचा संदेश समाजात पसरवला आहे. यामुळे संपूर्ण मतदारसंघात शिरसे गावाचे नाव आदराने घेतले जाते. विठ्ठल-रुक्मिणी आणि हनुमानाच्या आशीर्वादाने हा दीपोत्सव यापुढेही अशीच परंपरा टिकवून ठेवेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला

वारकरी संप्रदायाच्या मार्गदर्शनाखाली आणि पांडुरंगाच्या आशीर्वादाने होणारा हा सोहळा केवळ धार्मिक नाही, तर एकतेचा आणि संस्कारांचा संदेश देणारा आहे. यामुळे गावात सकारात्मक ऊर्जा आणि नवचैतन्य निर्माण होत आहे. शिरसे गावाला वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा असून येथील वारकरी मंडळी कडून अनेकांना शिकण्यासारखे असल्याचे ही आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगीतले .

# सांकशी गडावर आढळल्या तीन पुरातन मूर्ती

**पेण : रामप्रहर वृत्त**

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान रविवारी (दि. २९) सांकशी गडावरील ४७वी मोहीम राबवत असताना गडावरील पाण्याचे टाके साफ करत असतांना पाण्याच्या टाक्यात श्री महादेवाची पिंड, भग्न अवस्थेतील नंदी महाराज आणि हातात धनुष्यबाण घेतलेली गड देवतेची मूर्ती अशा तीन पुरातन मूर्त्या टाक्यातील गाळ काढताना श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या धारकऱ्यांना आढळल्या.



शिवछत्रपतींनी जो गडकोटांचा वारसा आपल्याला दिलाय तो जपण्यासाठी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या माध्यमातुन मागील चार वर्षापासून सांकशी गडावर निरंतर गड संवर्धन मोहिमा होत आहेत आणि या गड संवर्धन मोहिमेत पेण, पनवेलसह आजूबाजूच्या परिसरातूनदेखिल अनेक धारकरी, सेवेकरी गड संवर्धन मोहिमेत सहभागी होत असतात. आजपर्यंत गडावर ४६ संवर्धन मोहिमा श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या माध्यमातून झाल्या. त्यामधे गडावरील दगड, माती, गाळ याने भरलेल्या अनेक पाण्याच्या टाक्या स्वच्छ करण्यात धारकरी बंधूंना यश मिळाले आहे पण आजची मोहीम सर्व गड संवर्धन मोहिमाचाआनंद द्विगुणित करणारी आणि सर्वांना शिवकाळात घेवून जाणारी मोहीम ठरली. यापूर्वी सांकशी गडावर कोणत्याही देव-देवतेची मूर्ती नसताना धारकरी गडावर गड संवर्धन कार्य चालू करण्यापूर्वी गड देवतेचे स्मरण करुन गडाला नारळ, हार वाहून पूजा करत होते आणि प्रत्येक जण गडाच्या गड देवतेला साकड घालत होते प्रार्थना करत होते, गड संवर्धन कार्य करणाऱ्यांना शक्ती आणि कार्याला यश दे,ज्याप्रमाणे शिवकाळात आपल्या मावळ्यांनी, पूर्वजांनी गडावर देव-देवदेवतेची पूजा केली असेल ते भाग्य आम्हालासुद्धा गडावरील देव-देवतांची सेवा करायची, पूजा करायचे भाग्य मिळुदे

आज सांकशी गडाच्या गडदेवतेने आणि श्री महादेवाच्या रुपात नंदीने दर्शन दिले. गडावर सर्व देवतांचे अभिषेक घालून पूजा आणि आरती करुन भंडारा उधळून सर्वांनी आनंद उस्तव साजरा केला.आज जे आपल्याला फळ मिळाले आहे ती आपल्याला साक्षात भगवंतांनी आपल्या कार्याची दिलेली पोचपावती आहे असल्याचे श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या सर्व सेवेकऱ्यांचे म्हणणे आहे


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन **डॉ. रंजना विजय माथूर** यांचेकडून विकत घेण्याच्या विचारात आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :

**-: मिळकत वर्णन :-**

**मौजे - भेरले, तालुका पनवेल, जिल्हा रायगड -**

| सर्व्हे/गट नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|
| ११९ | १ पो.ख. | ० हे - ५९- आर ७० पॉ.<br>० हे -१०-आर-१० पॉ.<br>**० हे-६९ आर -८० पॉ.** | ०७ - ८७ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहीवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर '२१ दिवसांच्या आत' आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, दावा न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. श्री. शैलेश मनोहर पांचाळ,**
पत्ता : शॉप नं. ०८, अंबिका आर्केड,
लोखंडी पाडा, पनवेल कोर्टाच्या बाजूला,
पनवेल ४१० २०६, मो. ९१३६०४९७८८

**ठिकाण : पनवेल,**
**तारीख : २९/१२/२०२४**


# गोवेले कोंड स्वप्नातील गाव म्हणून सन्मानित

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील गोवेले कोंड हे गाव २७ डिसेंबर रोजी स्वप्नातील गाव म्हणून घोषित झाले. यामुळे संपूर्ण परिसरात आनंदाची लहर निर्माण झाली. या गावाने स्वप्नातील गावाचे ८०% मापदंड पूर्ण करत आपले ध्येय गाठले आणि ही एक ऐतिहासिक कामगिरी ठरली.



गाव विकास समितीने आणि ग्रामस्थांनी २०२३मध्ये एकत्र येऊन स्वच्छ, सुंदर, स्वस्थ, साक्षर आणि समृद्ध गाव घडवण्याचा निर्धार केला. स्वदेस फाऊंडेशनच्या सहकार्याने गावाने व्यावसायिक दृष्टिकोनातून गाव विकास आराखडा तयार केला. महिलांनी घरांच्या रंगकामातून आणि रस्त्यांच्या स्वच्छतेतून गावाला देखणा चेहरा दिला. गावातील प्रत्येक घटकाने योगदान दिले. गावातील युवकांनी डिजिटल तंत्रज्ञान शिकून गावासाठी नवीन कल्पना राबवल्या. या सर्व प्रयत्नांचा परिपाक म्हणजे गोवेले कोंडला स्वप्नातील गाव हा सन्मान मिळाला.

स्वदेस फाऊंडेशनचे वरिष्ठ व्यवस्थापक नाझीर शिकलगार आणि शिवसेना उपजिल्हा प्रमुख रमेश मोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी ग्रामस्थांनी केलेल्या प्रगतीचे कौतुक केले व वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याशिवाय स्वदेस टीममधून मेघना फडके, शीतल सूर्यवंशी, सिद्धेश शिर्के, ऋतुजा खाडस, केतन चव्हाण, मीनल लोहकरे हेदेखील कार्यक्रमास उपस्थित होते.

# खालापुरात अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**खोपोली: प्रतिनिधी**

मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत गजानन पांडुरंग पवार (वय ३५ शिरवलीवाडी खालापूर) याचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी रात्री घडली. रात्री एक वाजण्याच्या सुमारास गजानन खोपोलीहून खालापूरच्या दिशेने येत असताना बागेश्री हॉटेल नजीक अज्ञात वाहनाने धडक दिल्याने गंभीर जखमी झाला



उपचारापुर्वीच त्याचा मृत्यू झाला. गजानन हा खालापूर येथील बँकेत शिपाई म्हणून काम करीत होता


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. यतिन भगवान पाटील** यांचेकडून विकत घेण्याच्या विचारात आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः

**-: मिळकत वर्णन :-**

**मौजे - मोहो, तालुका पनवेल, जिल्हा रायगड -**

| सर्व्हे/गट नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|
| २८ | २/क | ० हे-१८ आर-०० पॉ. | ०१ - ८२ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहीवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर '२१ दिवसांच्या आत' आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, दावा न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. श्री. शैलेश मनोहर पांचाळ,**
पत्ता : शॉप नं. ०८, अंबिका आर्केड,
लोखंडी पाडा, पनवेल कोर्टाच्या बाजूला,
पनवेल ४१० २०६, मो. ९१३६०४९७८८

**ठिकाण : पनवेल,**
**तारीख : २९/१२/२०२४**


# श्रीवर्धनमध्ये मच्छिमारांना ट्रान्सपॉन्डर सुरक्षेसाठी नवीन योजनेची अंमलबजावणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

तालुक्यातील मच्छिमारांसाठी एक महत्वाची योजना केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजने अंतर्गत सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा उद्देश समुद्रात मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांची सुरक्षा सुनिश्चित करणे आहे. श्रीवर्धन तालुक्यातील विविध मच्छिमारी नौकांवर मोफत ट्रान्सपॉन्डर उपकरणे बसवण्याची योजना लागू केली आहे.






ट्रान्सपॉन्डर उपकरण इस्त्रोच्या कंपनीने विकसित केले आहे. त्याला नभमित्र ॲपच्या सहाय्याने समुद्रातील मासेमारी नौकांचा ट्रेकिंग करणं अधिक सोयीचं होईल. या उपकरणामुळे, नौका समुद्रात हरवली, इंजिन खराब झाले किंवा आग लागली असल्यास, नियंत्रण कक्षाशी थेट संपर्क साधता येईल. नव्या योजनेतून मच्छिमारांना वेळीच मदत मिळणे सोपे होईल.

नौकांवर बसवलेल्या ट्रान्सपॉन्डर उपकरणामध्ये एक विशेष बटन दिलं जातं, जे थेट नियंत्रण कक्षाशी संपर्क साधतं. यामुळे, समुद्रात कोणत्याही प्रकाराची आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास, नियंत्रण कक्षाला नौकेच्या स्थानाबाबत त्वरित माहिती मिळेल. यामुळे समुद्रातील आपत्कालीन स्थितींमध्ये मदत मिळवणे अधिक सुलभ होईल.

आतापर्यंत श्रीवर्धन तालुक्यातील आदगाव, जीवना, भरटखोल, मुलगाव, दांडा, वाशी, हवेली, पाब्रा इत्यादी ठिकाणी एकूण ३२० ट्रान्सपॉन्डर उपकरणे बसवण्यात आली आहेत. सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी अ. भि. साळुंखे यांनी या उपक्रमाचे महत्त्व सांगुन मच्छिमारांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

समुद्रात जाणाऱ्या मच्छिमारांसाठी योजनेचा लाभ अत्यंत महत्वाचा आहे आणि अधिकाधिक नौकांनी यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केलं जात आहे. यातून मच्छिमारांच्या सुरक्षिततेला प्रोत्साहन मिळेल आणि ते अधिक विश्वासाने समुद्रात मासेमारी करू शकतील.

**समुद्रात अचानक आपत्कालीन परिस्थिती उद्भवू शकते आणि त्यासाठी ट्रान्सपॉन्डर उपकरणे अत्यंत महत्वाची ठरतात. या उपकरणांमुळे समुद्रात असलेल्या मच्छिमारांना तातडीने मदत मिळवता येईल. मासेमारी नौकांवर दोन ते सहा सिलेंडर असले तरी, ट्रान्सपॉन्डर उपकरणांच्या मदतीने आपल्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाऊ शकते.**

**- अ. भि. साळुंखे, सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी**


## "नोटीस"

विषयः- **उशिरा मृत्यू नोंद करणेबाबत.**

संदर्भ :- अर्जदार श्री. गितेश राजेंद्र यादव, रा.विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड यांचा दि. ०९/१२/२०२४ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. गितेश राजेंद्र यादव, रा.विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी कै. राजेंद्र मारुती यादव यांची उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी कार्यकारी दंडाधिकारी ता. पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक १४/१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर मृत्यू नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काहीएक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(संजय भालेराव)**
प्र. निवासी नायब तहसलिदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी पनवेल

पत्र.क्र.मशा/प्रशा-१/ उशिरा मृत्यू नोंद नोटीस/२०२४/२२३/२०२४

## निवडक

### विवेकानंद संकुलातर्फे संगम लोककला

**नवी मुंबई :** सानपाडा येथील माध्यमिक विद्यालय विवेकानंद संकुलतर्फे संगम लोककलेचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळावर ३१ डिसेंबर रोजी वर्षाअखेरीस हा कार्यक्रम वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात सकाळी ११ ते २ या वेळेत होणार आहे. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्कार इन्फोचे चीफ मॅनेजिंग डायरेक्टर सुनील खन्ना तसेच दीपक पळसुले उपस्थित राहणार आहेत. छत्रपती शिक्षण मांडला कल्याणचे कोषाध्यक्ष विश्वास सोनवणे हे कार्यक्रमाध्यक्ष असणार असल्याची माहिती छत्रपती शिक्षण मंडळ कल्याणचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार जोशी यांनी दिली.

### सुभाष सोनवणे सेवानिवृत्त

**नवी मुंबई :** महापालिकेचे कार्यकारी अभियंता सुभाष बुधा सोनवणे हे महापालिकेच्या सेवेतील आपली ३१ वर्ष यशस्वी



सेवा पुर्ण करून ३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्ती होत आहेत. नवी मुंबई महापालिकेची स्थापना–१९९२ मध्ये झाल्यानंतर सन– १९९३ सुभाष सोनवणे हे नवी मुंबई महापालिकेत कनिष्ठ अभियंता म्हणुन पालिकेच्या सेवेत रुजू झाले होते. कनिष्ठ अभियंता ते कार्यकारी अभियंता पदा पर्यंत त्यांनी सन –१९९३ ते २००१ असे आठ वर्ष कनिष्ठ अभियंता म्हणून पाणी पुरवठा व स्थापत्य विभागांचे काम पाहिले सन २००१ मध्ये उप अभियंता पदावर पदोन्नती मिळाल्यानंतर पाणी पुरवठा, मालमत्ता विष्णुदास भावे नाट्यगृहाची जबाबदारी ते सांभाळत होते. सन –२००८ मध्ये कार्यकारी अभियंता म्हणून ते कार्यरत होते. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत एकुण ३१ वर्ष पालिकेतील आपल्या सेवेची पूर्ण करून ते सेवानिवृत झाले.

### काजल संकपाळ बनली सीए



**नवी मुंबई :** पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलाची माजी विद्यार्थिनी काजल कोंडीबा संकपाळ हिने नुकतीच सीए परीक्षा उत्तीर्ण केली. काजल एका सामान्य कुटूंबातील असून वडील रिक्षा चालवतात. मराठी माध्यमाच्या शाळेतून तिचे माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण घेतले. काजलच्या वडिलांनी केवळ रिक्षा चालवून त्यांच्या तिन्ही मुलांना उच्चशिक्षित केले. पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक गोरख कदम, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, समन्वयक पांडुरंग मुळीक, आदर्श शिक्षक अविनाश कुलकर्णी यांनी काजल आणि तिच्या वडिलांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नवी मुंबईला अमली पदार्थांचा विळखा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ठाणे जिल्ह्यात अमली पदार्थांसंदर्भातील गुन्ह्यांमध्ये वाढ होत असून जिल्ह्यातील नवी मुंबई शहराला अमली पदार्थांचा विळखा बसला आहे. या वर्षभरात अमली पदार्थांची ६५४ प्रकरणे समोर आली आहेत. २०२३मध्ये अमली पदार्थांच्या गुन्ह्याचे प्रमाण ४७५ इतके होते. त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत अमली पदार्थांच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याचे स्पष्ट होते. यावर्षी अमली पदार्थ संबंधातील गुन्ह्यांमध्ये ५८ विदेशी नागरिकांना अटक झाली. यातील बहुतांश आफ्रिकेतील आहेत.

रेव्ह पार्ट्या किंवा इतर तस्करीच्या माध्यमातून अमली पदार्थ तरुण–तरुणींपर्यंत पोहचविले जातात. त्यामुळे या अमली पदार्थांच्या विळख्यात सर्वसामान्य घरामधील तरुण–तरुणी बळी पडत आहेत. नवी मुंबई शहरामध्ये यावर्षी अमली पदार्थ संदर्भात ६५४नोंद झाल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थांपैकी कोकेन हे सर्वाधिक किमतीचे आहे. यावर्षी १६ कोटी ७० लाख रुपयांचे कोकेन जप्त करण्यात आले असून, २०२३ मध्ये एक कोटी २५ लाख रुपयांचे कोकेन जप्त केले होते. तर १२ कोटी ६७ लाख रुपयांचे मफेड्रॉन जप्त करण्यात आले आहे.



**कोकेन सर्वाधिक**

जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थांपैकी कोकेन हे सर्वाधिक किमतीचे आहे. यावर्षी १६ कोटी ७० लाख रुपयांचे कोकेन जप्त करण्यात आले असून, २०२३ मध्ये एक कोटी २५ लाख रुपयांचे कोकेन जप्त केले होते. तर १२ कोटी ६७ लाख रुपयांचे मफेड्रॉन जप्त करण्यात आले आहे.

गांजा आणि ब्राऊन शुगर जप्तीमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. २०२४ मध्ये ६७ लाख ८३ लाख रुपयांचा गांजा जप्त केला आहे. तर जप्त ब्राऊन शुगरची किंमत ३० लाख १० हजार रुपये आहे. एलएसडी पेपरच्या तुकडेही पोलिसांनी जप्त केले. त्याची किमंत ३३ लाख ५५ लाख रुपयांचे जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या मद्याची एकूण किंमत ३३ कोटी २७ लाख रुपये आहे. तर गेल्यावर्षी याचे प्रमाण २२ कोटी ९७ लाख रुपये इतके होते. २०२४ मध्ये अंमली पदार्थ प्रतिबंधात्मक कायद्यांतर्गत गुन्ह्यांमध्ये ९३९ जणांना अटक झाली. तर गेल्यावर्षी ८११ जणांना अटक झाली होती. यावर्षी अटकेत असलेल्यांपैकी ५८ जण विदेशी नागरिक आहेत. यातील सर्वाधिक आफ्रिकेतील आहेत. तर २०२३ मध्ये ३७ विदेशी नागरिकांना अटक झाली होती.

## विद्यार्थ्यांनी अंकुराप्रमाणे आपल्या कलांचा विकास करावा –मंगेश चितळे

**कळंबोली : बातमीदार**

शालेय जीवनातील स्नेहसंमेलनात कलागुणांचा निश्चितच विकास हा होत असतो. विद्यार्थ्यांनी कोणतीही भीती न बाळगता स्नेहसंमेलनात आपल्या कलेचे गुणदर्शन चांगल्या पद्धतीने करावे तरच जीवनात यशस्वी होता येईल. विद्यार्थ्यांनी अंकुराप्रमाणे आपल्या कलांचा विकास साधून विद्यालयाचे ही नाव उज्वल करावे, असे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी कळंबोली येथे केले.



सुधागड विद्या संकुलाचे स्नेहसंमेलन विद्या संकुलाच्या प्रांगणात पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता दीप प्रज्वलित करून करण्यात आले. यावेळी विद्यालयातील माजी विद्यार्थी व कल्याण डोंबिवली महापालिकेतील उपायुक्त वंदना गुळवे, विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोथे, महापालिकेतील माजी नगरसेवक विजय खानावकर, मराठी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वनिता कोळी, उप मुख्याध्यापक सुरेश शिंदे, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका कल्पना कुलकर्णी, माजी मुख्याध्यापक पी एल गायकवाड, शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयाच्या प्राचार्य विलासिनी ठिगळे तसेच विद्यार्थी पालक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होता.

या वेळी विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे प्रदर्शन या वेळी प्रदर्शित केले. सलग पाच दिवस चालणारे हे स्नेहसंमेलन विविध माध्यमांचे असे असणार आहे. सुधागड विद्या संकुलात मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू माध्यमाचे तब्बल १२००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पाचशे ते सहाशे कर्मचारी वर्ग विद्यालयात कार्यरत आहे. या सर्वांचे एकत्रित असे स्नेहसंमेलन विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी अंकुर या शीर्षकाखाली आयोजित केले आहे. पाच दिवस चालणाऱ्या स्नेहसंमेलनात विविध कला गुण प्रदर्शित केले जाणार आहेत.

## तुर्भे येथे सहा बॅटरी चोरल्या

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे येथील जनता मार्केटजवळ रात्रीच्या वेळी पार्क करून ठेवलेल्या दोन डंपरमधील सहा बॅटरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे.

या प्रकरणी डंपरचे मालक संजय नामदेव चव्हाण यांनी एपीएमसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्याअधारे अज्ञात चोरांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. गेल्या काही दिवसांपासून चोरट्यांनी वाहनांच्या बॅटरीवर आपले लक्ष केंद्रीत केले आहे. रात्रीच्या वेळी संधी साधत रस्त्यालगत पार्क केलेल्या गाड्यांच्या बॅटरी पळविल्या जात असल्याच्या तक्रारी आहेत.

या प्रकरणी अनेक वेळा पोलिसांत तक्रारी करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने या बॅटरी चोरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी वाहनधारकांकडून केली जात आहे.

## गृहनिर्माण योजनेत पोलिसांसाठी घरे राखीव ठेवण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोकडून गृहनिर्माण योजना राबविली जात आहे, मात्र यात पोलीस बांधवांना मात्र घरे राखीव ठवेलेली नाहीत. हीच बाब लक्षात घेत सानपाडा येथील सामाजिक कार्यकर्ते सुभाष म्हात्रे यांनी सिडको एमडी विजय सिंघल यांना पत्र देत पोलिसांसाठी किमान पाच टक्के घरे राखीव ठेवावीत, अशी मागणी केली आहे.

पोलीस बांधव ऊन पावसाची तमा न बाळगता सदैव समाजाचे रक्षण करत असतात. त्यामुळेच आपण आपले सण, उत्सव निर्भयपणे साजरे करत असतो. याशिवाय शासनावर जेव्हा मोर्चे नेले जातात तेव्हा शासकीय अधिकाऱ्यांना सुरक्षा कवच म्हणून पोलीस बांधवच पुढे येत असतात. पोलिसांना राहण्यासाठी अनेक ठिकाणी पोलिस लाईन कॉलनी आहेत पण त्यांची दुरवस्था झालेली आहे. अशा दुरवस्था झालेल्या घरांमध्ये पोलीस कुटुंबीय राहत आहेत. निवृतीनंतर पोलिसाना ही घरे सोडून जावी लागतात.

अनेक पोलिसांना त्यांची स्वतःची घरे नसल्याने निवृत्तीनंतर भाड्याच्या घरात आयुष्यभर रहावे लागते, अशी अनेक उदाहरणे दिसून येतात. सिडकोतर्फे काढलेल्या गृहनिर्माण योजनेत पोलिसांचा विचार करून त्यांना पाच टक्के राखीव कोटा ठेवावा, त्यामुळे अनेक पोलिसांना हक्काचे घर मिळेल अशी विनंती सामाजिक कार्यकर्ते म्हात्रे यांनी केली आहे.

सिडकोने यंदा गृहनिर्माण योजना आणली असली, तरी घरांच्या किमती मात्र जाहीर केलेल्या नाहीत. त्यामुळे या घरांमध्ये नोंदणी करणाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे त्यामुळे घराच्या किंमती सुद्धा लवकरात लवकर निश्चित करण्यात याव्यात, अशीही मागणी सुभाष म्हात्रे यांनी केली आहे.



**पनवेल : मराठी क्रीडा पत्रकारितेत सर्वाधिक सहा वेळा ऑलिम्पिक स्पर्धेचे वार्तांकन करणारे पत्रकार संदीप चव्हाण यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची रविवारी सदिच्छा भेट घेतली. या वेळी ज्येष्ठ पत्रकार दीपक म्हात्रे उपस्थित होते.**

## महामुंबई सेझग्रस्तांच्या जमिनी परतीची सुनावणी १ जानेवारीला

**उरण : प्रतिनिधी**

महामुंबई सेझ ग्रस्तांच्या जमीनी परत करण्याची सुनावणी गुरुवारी तारीख देण्यात आली होती, मात्र याहीवेळी शेतकऱ्यांना पुन्हा एकदा तारीख देण्यात आली असून १ जानेवारीला सुनावणी होणार आहे. पुन्हा सुनावणी पुढे ढकलण्यात आल्याने शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. या संदर्भात उच्च न्यायालयाने सहा आठवड्यात सुनावणी करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. ही मुदतही संपुष्टात आली आहे. विविध कारणांमुळे सातत्याने तारीख पे तारीख दिली जात आहे.

उरण, पनवेल आणि पेण या तिन्ही तालुक्यातील सुमारे ८५० सेझग्रस्त शेतकऱ्यांना सुनावणीची प्रतीक्षा आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार गंभीर नसल्याची बाब अधोरेखित होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. महामुंबई सेझसाठी संपादन करण्यात आलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याच्या निर्णयावर सहा आठवड्यात निर्णय देण्याच्या उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही मागील काही सुनावणी विविध कारणांमुळे जिल्हाधिकाऱ्यांनी पुढे ढकलल्या आहेत.

सन २००५–०६ मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे महामुंबई सेझ कंपनीने उरण, पनवेल, पेण तालुक्यामधील जमीन मिळकती प्रकल्पाकरिता खरेदी करून परस्पर स्वतःचे नावावर करून घेतल्या.

सेझ प्रकल्प स्थापण्यापूर्वी विकास आयुक्त (उद्योग) यांनी त्यांचे १६ जून २००५ रोजीचे आदेशानुसार सेझ कंपनीने खरेदी केलेल्या जमीन मिळकती पंधरा वर्षामध्ये न वापरल्यास अथवा त्यावरती प्रकल्प उभा न केल्याने संबंधित शेतकऱ्यानी मागणी केल्यास सदरच्या जमीन मिळकती संबंधित शेतऱ्याना मुळ किंमतीला परत कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

> **सेझ कंपनीकडून शेतकऱ्यांच्या ज्या जमीनी साठेकरार आणि खरेदीखत यांच्याद्वारे जमीनी नावे करणे बेकायदेशीर असल्याने हे व्यवहार रद्द करण्याची मागणी करीत जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करण्यात आला आहे. या संदर्भात गुरुवारी रायगड जिल्ह्याचे अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांनी दिली.**
> **–ॲड. दत्तात्रेय नवाळे,**
> **सेझग्रस्त, शेतकरी सल्लागार**

## 'रयत'च्या गव्हाण विद्यालयात शालेय मूल्यांकन मानके पर्यवेक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या नाविन्यपूर्ण शाळा तपासणी योजनेंतर्गत ह्या शैक्षणिक वर्षापासून सुरू होत असलेले शालेय गुणवत्ता मानके मूल्यांकनपथक पर्यवेक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शुक्रवारी (दि.२७) झाले.



रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व संस्थेच्या ज्युचंद्र येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय या शाखेचे चेअरमन विनय पाटील यांच्या समवेत संस्थेच्या रायगड विभागाचे सहायक विभागीय अधिकारी व ज्युचंद्र शाखेचे मुख्याध्यापक विलासराव जगताप यांच्या नेतृत्वाखालील पथकाने शाळेची गुणवत्ता, अध्ययन–अध्यापन प्रक्रिया, प्रशासकीय कामकाज, सामाजिक सहभाग,भौतिक सुविधा इ.मुद्द्यांच्या अनुशंगाने अंतर्बाह्य तपासणी केली. या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन आणि रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुण भगत तसेच स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी तसेच संस्थेचे रायगड विभागीय अधिकारी मोहनराव कोंगेरे आणि लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य प्रमोद कोळी यांनी भेट देऊन पथक पर्यवेक्षणास शुभेच्छा दिल्या. पथकामध्ये सन्माननीय सदस्य रयत को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक तथा वाशी शाखेचे चेअरमन किशोर पाटील,एस. सी.भोसले, तंत्रस्नेही शिक्षक एस.आर.गावंड, ए.ए.पाटील,पी.आर.पाटील, डी.आर.गळवे, ए.बी.वाघ यांचा समावेश होता.

प्रारंभिक सत्रात पथकातील सर्व सदस्यांनी विद्यालयाच्या विविध कामकाजाची पाहणी केल्यानंतर शालेय परिपाठामध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्पोकन इंग्लिश प्रकल्पांतर्गत इंग्रजी भाषेतून सादर केलेल्या परिपाठाचे सर्व मान्यवरांनी कौतुक केले. मान्यवरांचे पुष्पगुच्छ व लेखनी प्रदान करून स्वागत करण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, चित्रलेखा पाटील, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, प्रमोद करावकर, लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे तसेच ज्युचंद्र येथील हरीश पाटील व कीर्तीकुमार पाटील यांचेसह अन्य शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

परिपाठ आणि समारोपाच्या सत्रात प्रमुख मनोगत व्यक्त करताना पथकाचे प्रमुख आणि रायगड विभागाचे सहायक विभागीय अधिकारी विलासराव जगताप यांनी विद्यालयाच्या सर्वांगीण विकासाच्या तपासणीचा आढावा घेत आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या परिपाठाचे कौतुक करून विद्यार्थ्यांनी ज्ञानलालसा वाढवावी तसेच गुणवत्तावृद्धी आणि क्रीडा नैपुण्य वृद्धी करावी, असे प्रतिपादन केले व काही महत्वपूर्ण सूचना केल्या.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे संस्थेने प्रायोगिक तत्त्वावर निवडलेल्या शाखांमध्ये देखील रायगड विभागातून गव्हाण शाखेचा समावेश होता आणि प्रत्यक्ष नियमित पथक पर्यवेक्षणाचा प्रारंभदेखील गव्हाण शाखेतूनच झाला. महिनाभरापूर्वी प्रायोगिक तत्त्वावर झालेल्या पथक पर्यवेक्षणाच्या तुलनेत झालेल्या नियमित पथक पर्यवेक्षणामध्ये विद्यालयाच्या गुणवत्ता मानके मूल्यमापनामध्ये वृद्धी झाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले.

पथक पर्यवेक्षणाच्या समारोपीय सत्रात पथक प्रमुखांसह सर्व सन्माननीय सदस्यांनी आपली मते व निरीक्षणे नोंदवली. विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले तर सागर रंधवे यांनी सूत्रसंचालन केले.

## 'सीकेटी'च्या वेदांत पाटीलचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समिती शिक्षण विभाग, पनवेल गणित विज्ञान अध्यापक मंडळ व रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उलवे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५२वे पनवेल तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २७ व २८ डिसेंबर रोजी शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयावर रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उलवे येथे आयोजित केले होते.



स्पर्धा विज्ञान प्रदर्शन, निबंध स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा अशा तीन भागात विभागण्यात आली होती. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वेदांत विलास पाटील (अकरावी सायन्स) याने वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक तर निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला त्याबद्दल सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन त्याचा गौरव करण्यात आला तसेच सुधाकर यादव (अकरावी सायन्स) या विद्यार्थ्यांचा विज्ञान प्रदर्शनातील सहभागाबद्दल प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

वेदांतने मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील आदींनी अभिनंदन केले आहे.

## एफ.जी. नाईक महाविद्यालयाचा सांस्कृतिक आठवडा जल्लोषात

**नवी मुंबई : बातमीदार**

एफ.जी. नाईक महाविद्यालयात १७ ते २१ डिसेंबर २०२४ या दरम्यान सांस्कृतिक आठवडा मोठ्या दिमाखात व जल्लोषात साजरा करण्यात आला.

दरवर्षी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी व त्यांचे कला गुण प्रदर्शित होण्यास एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने व त्यांचे व्यक्तीत्व आणखी खुलवण्यासाठी दरवर्षी महाविद्यालयामध्ये विविध सांस्कृतिक स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी बनवलेल्या खाद्यपदार्थांची स्टॉल्स, रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, पोस्टर मेकिंग, ब्रायडल मेकअप, नेल आर्ट, मीस मॅच डे, रोझ डे, सारी डे, टाय डे. ट्रॅडिशनल डे फॅन्सी डे यांचे आयोजन करण्यात आले होते.

सांस्कृतिक आठवड्याची सुरुवात ही विद्यार्थ्यांनी बनवलेल्या विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉलसनी झाली. या कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत या सर्व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग दर्शवत आपल्या कलागुणांना आकार द्यावा, असे आवाहन केले.

या सांस्कृतिक आठवड्यादरम्यान आयोजित विविध स्पर्धांचे परीक्षण गौरी पवार, वृषाली जेधे, अर्चना देसाई, वृषाली साळवे, वैशाली चोरमारे या परीक्षकांनी केले. साक्षी गायकवाड द्वितीय वर्ष वाणिज्य शाखा हिने यावर्षीचा रोज क्वीन हा किताब पटकावला तर विघ्नेश नेहारकर तृतीय वर्ष कला शाखा याने रोज किंग हा किताब पटकावला.

या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक समितीच्या अध्यक्ष प्राध्यापिका जयश्री दहाट, प्राध्यापिका समिधा पाटील, प्राध्यापिका सीमा शिंदे, प्राध्यापिका चिन्मय वैद्य मॅडम प्राध्यापिका स्वाती हैलक व प्राध्यापिका प्राजक्ता सावंत, ग्रंथपाल जयश्री मोरे व योगेश पाटील यांच्या नियोजनांतर्गत झाले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षक इतर कर्मचारी यांचेही सहकार्य व उपस्थिती होती.



# ‘थर्टीफर्स्ट’च्या पार्ट्यांवर करडी नजर

**पेण : प्रतिनिधी**



मुंबई, ठाणे, नवीमुंबई, कर्जत, माथेरान, महाबळेश्र्वर, अलिबाग या ठिकाणातील फार्म हाउस खिश्याला परवडत नसल्याने अनेक आंबट शौकीनांची पाउले पेण येथील फार्म हाउसकडे गेली दोन वर्षात वाढली आहेत. त्यातच नाताळ पासून ३१ डिसेंबर पर्यंत या फार्म हाउसवर हाउस फुल गर्दी असते.

या पार्श्वभूमीवर पेण तालुक्यातील पुर्व भागातील व पाबळ खोऱ्यातील फार्म हाउसवर अवैधरित्या दारू, गांजा, चरस, असे आंबट शौकीनांचे नशे वाढवणाऱ्या पदार्थांची रेलचेल वाढत असल्याचा संशय खाकीला आल्याने खाकी सतर्क झाला आहे. त्यातच परवाना नसताना अनधिकृत ढाबे, चायनिज सेंटर, हॉटेल, यामध्येदेखील खुलेआम मद्यविक्री केली जाते. याकडे देखील उत्पादन शुल्क विभागाची बारीक नजर आहेच. त्यातच कोणत्याही फार्म हाउस वर दारू विक्री अथवा पिण्यास सक्त मनाई असताना पुर्व विभागातील एक प्रसिध्द वॉटरपार्कमध्ये सर्रास दारूची विक्री होत असल्याची माहिती खाकीवाल्यांना मिळालेली आहे. त्यातच त्या वॉटर पार्कवर रात्रीच्या वेळी मुजर्याचे कार्यक्रम सुध्दा होत असल्याने कळत-नकळत चरस, गांजा सेवन करणारे आंबट शौकीन मोठ्या प्रमाणात पूर्व विभागात येतात.

एकंदरीत रम-रमा-रमी ची रेलचेल पुर्वविभागाती फार्म हाउस मध्ये होणार यात काही शंकाच नाही. त्यामुळे खाकीवाल्यांनी या वेळेला या आंबट शौकीनांबरोबर आम्ली पदार्थ विक्री करणाऱ्या टोळक्यांवरदेखील बारीक नजर ठेवली आहे.

खाकीचा विशेष दस्त तयार झाला असून या दस्ताच्या माध्यमातून या फार्महाउस मालकांवर व फ्द्ध्या बापांच्या ढेडयांवर तसेच आंबट शौकीनांवर कायदेशीर कारवाई होणार यात काही शंका नाही.

# खासदार सुनील तटकरेंच्या आदेशाने भोईघर एसटी सुरू





**मुरूड : प्रतिनिधी**

गेले तीन वर्ष भोईघर गाडी बंद असल्याने मुरूड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख नेते मनोज भगत यांच्या नेतृत्वाखाली माजी सभापती बाबू नागावकर, बारशीव येथील राष्ट्रवादी कार्यकर्ते संजय महाडिक, मुरूड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपाध्यक्ष संतोष कांबळी, मुरूड शहरातील प्रतिष्ठित व्यापारी भावेश शहा, आगरदांडा उपसरपंच संतोष पाटील यांनी रोहा येथे खासदार सुनील तटकरे यांची भेट घेऊन एसटी बाबत आपल्या समस्या मांडल्या. त्यांच्या आदेशाप्रमाणे भोईघर गाडी सुरू झाली आहे.

या सभेत पेण रामवाडी येथील विभाग नियंत्रक घोडे, मुरूड आगारव्यवस्थापक रोहन शिंदे हे उपस्थित होते. या वेळी उपस्थित अधिकारी वर्गाला खासदार सुनील तटकरे यांनी तातडीने भोईघर गाडी सुरु करण्याचे आदेश देत मुरूड आगारचा कारभार सुधारा व प्रवासी वर्गाला दिलासा द्या, असे आदेश विभाग नियंत्रक याना दिले. या वेळी विभाग नियंत्रक यांनी तातडीने ही गाडी सुरू करणार असल्याचे अभिवाचन या वेळी त्यांनी दिले.

या वेळी मनोज भगत यांच्यासह प्रतिष्टीत व्यापारी भावेश शहा यांनी खासदार तटकरे यांच्या निदर्शनास आणून दिले कि, मुरूड आगारात नवीन गाड्या संख्या कमी आहे. प्रत्येक गाडी हि ८ ते १० वर्ष वापरून जुन्या गाड्या मुरूड आगारास देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे जुन्या गाड्या रस्त्यामध्ये बंद पडणे, प्रमाण खूप वाढले आहे. याचा नाहक त्रास प्रवासी वर्गाला सहन करावा लागत अशी कैफियत या वेळी त्यांनी मांडली. या प्रश्नाबाबत खासदार सुनील तटकरे यांनी एसटी महामंडळाचे विभागीय उपाध्यक्ष कुसेकर याना फोन लावून नवीन गाड्या उपलब्ध होताच मुरूड, महाड, श्रीवर्धन व रोहा या आग्राचा प्राधान्य देण्यात यावे अशी आग्रहाची भूमिका मांडली. जर नवींन गाड्या उपलब्ध नसतील तर महामंडळाने भाडे तत्वार ज्या नवीन गाड्या घेतल्या आहेत त्या पैकी किमान १० गाड्या तरी मुरूड आगाराला देण्यात याव्यात अशी भूमिका मांडली. या वेळी खासदार तटकरे यांनी विभाग नियंत्रक याना मुरूड आगारातील ज्या काही समस्या आहेत त्या तातडीने सोडवण्यात येऊन प्रवासी वर्गाला दिलासा देण्यात यावा, असे आदेशसुद्धा त्यांनी दिले.

मुख्य रस्त्यापासून भोईघर हे गाव खूप आत असल्याने येथे शालेय विद्यार्थ्यांना कोणतेही वाहन उपलब्ध होत नसल्याने कित्येक किलोमीटरची शालेय विद्यार्थ्यांना पायंपीट करावी लागत होती. खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशाप्रमाणे आजपासून भोईघर गाडी सुरू झाल्याबद्दल माजी सभापती बाबू नागावकर व ग्रामस्थ यांनी खासदार तटकरे यांचे विशेष आभार मानले आहेत.

# गटारातील दुर्गंधीमुळे टपरीधारकांमध्ये नाराजी

**मुरूड : प्रतिनिधी**



मुरूड समुद्रकिनारी नव्याने बांधण्यात आलेल्या गटारेमधील पाण्याला दुर्गंधीचा वास येत असल्याने टपरीधारकांनी नाराजी दर्शवली आहे.

मुरूड समुद्रकिनारी ठिकाणी पर्यटकांची संख्या वाढावी व यामधुन स्थानिक नागरिकांना रोजगार मिळावा याकरिता मुरूड समुद्रकिनारा सुशोभीकरणचे काम सुरू आहे. हे काम ही अंतिम टप्प्यात आहे, परंतु या ठिकाणी नव्याने बांधलेले गटारे हे डोकेदुखी टपरीधारकांना ठरत आहे. गटारातील पाणी योग्य पध्दतीने निचरा होत नसल्याने पाण्याला दुर्गंधी पसरली आहे. यामुळे येणाऱ्या पर्यटकांना व स्थानिकांना या दुर्गंधीचा सामाना करावा लागत आहे. तसेच या दुर्गंधीमुळे डासांची पैदास दिवसांदिवस वाढत असल्याने याठिकाणी रोगराई पसरू शकते. याधास्तीने पर्यटक याठिकाणी खाण्यासाठी थांबत नसल्यामुळे टपरीधारकांना यांचा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. तसेच सुशोभीकरण याठिकाणी सिमेंटच्या धुळीचे साम्राज्य पसरले आहे.

हवा आली की ही धुळ खाण्यात पाण्यात जात असल्याने आर्थिक नुकसान होत आहे. तसेच येणाऱ्या स्थानिक व पर्यटकांना या धुळीच्या कणाचा त्रास होऊ लागला आहे. यांचा ठेकेदारांनी विचार करून योग्य तो पाऊले उचलुन सिमेंटच्या धुळीचे साम्राज्य व गटारात ला पाणी कसा निचरा होईल याकडे गांभीर्याने लक्ष देऊन गटार साफ केले पाहिजे तरच याठिकाणी पर्यटक व स्थानिक नागरिक थांबु शकतील. याबाबत पदमदुर्ग व्यवसायिक संघटनेचे अध्यक्ष

अरविंद गायकर यांनी आमच्या प्रतिनिधीनीशी बोलताना म्हणाले की, काम सुरू करण्यापूर्वी आम्हाला विश्वास न घेता या ठिकाणी गटारे बांधण्यात आली. या ठिकाणी गटाराची गरज नसताना या ठिकाणी गटारे बांधण्यात आली. यामुळे आमच्या टपरीधारकांची जागा कमी झाली. जी गटारे बांधली त्या गटारातुन नीट पणे पाण्याचा निचरा होत नसल्याने या ठिकाणी चिखल जमा झाला आहे आणि यांची दुर्गंधी ठिकाणी पसरत असल्याने याठिकाणी स्थानिक नागरिक व पर्यटक या ठिकाणी खाण्यासाठी व खरेदीसाठी थांबला मागत नाही. यामुळे सर्वंच टपरीधारकांच्या व्यवसायावर परिणाम होत असल्याने आम्ही स्वत: मुख्याधिकारी यांना भेटून हकीकत सांगण्यात आली.

कैफियत मांडताच तातडीने मुख्याधिकारी भेट देऊन पाहणी केली, परंतु त्यावर ठोस निर्णय होत नसल्याने आम्ही चार दिवसांपूर्वी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्या वतीने मुख्याधिकारी यांना या संदर्भात पुन्हा लेखी निवेदन देण्यात आले आहे. की या गटारातील पाणीचा झालेला चिखल काढुन द्या व सुशोभीकरण ठिकाणी सिमेंटचे धुळ जमा झाले आहेत ते ठेकेदारा कडुन पाणी मारुन स्वच्छता करावी जेणेकरून येणाऱ्या जाणाऱ्या पर्यटकांना व स्थानिकांना यांचा त्रास होणार नाही.

## हमरापूर येथे अज्ञाताचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील हमरापूर येथे रेल्वेच्या धडकेत अज्ञात व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

या अपघाताची अकस्मात मृत्यूची नोंद दादर सागरी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास दादर सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजयकुमार ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. २७ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजण्यापूर्वी रेल्वे फाटक क्रमांक १३ जवळच्या रेल्वे ट्रॅकवर अप- ०११४० मडगाव नागपूर एक्सप्रेस या रेल्वेची धडक बसल्याने व्यक्तीचा मृत्यू झाला.

या अपघाती खबर रामरतन डूंगरराम जाणी (वय. ३२ वर्षे, पोलीस शिपाई, आर. पी. एफ. चौकी पेण) यांनी पोलीस ठाण्यात दिल्यानंतर पोलीस निरीक्षक संजयकुमार ब्राम्हणे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहाणी केली असून अधिक तपास सुरू आहे.

(छाया : नितीन शेडगे)



अलिबाग : समुद्रकिनारी पर्यटकांनी गर्दी केल्याने शेजारील मैदान वाहनांनी खचाखच भरले होते.

# हाशिवरे कॉलेजचे स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**





अलिबाग तालुक्यातील महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय हाशिवरे विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण झाले.

या वेळी पारितोषिक वितरण प्रमुख अतिथी संकेत पाटील अवर सचिव विधी उच्च तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय हे उपस्थित होते. संकेत पाटील व अन्य मान्यवरांनी रांगोळी प्रदर्शन हस्तकला प्रदर्शन यांचे पाहणी करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले तसेच विद्यार्थ्यांप्रमाणे सदर विद्यालयातील शिक्षकांनीही शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या वेळी हाशिवरे हितवर्धक मंडळाचे संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र मोकल उपाध्यक्ष सरोज डाकी सचिव ज्ञानेश्वर मोकल ॲड. शैलेश मोकल निशिकांत मोकल सुबोध मोकल व संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच विद्यालयाचे प्राचार्य बीडी गायकवाड तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यालयाच्या वतीने उपस्थित मान्यवरांच्या सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले.

या वेळी हाशिवरे ग्रामपंचायत माजी सरपंच संध्या पाटील तसेच पंचक्रोशीतील सरपंच व विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम चांगल्या प्रकारे सादर केल्याबद्दल रसिक प्रेक्षकांनी विद्यालयातील कलावंतांचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बीडी गायकवाड सर्व शिक्षक पालक संस्थेचे पदाधिकारी व सर्व मान्यवरांचे सहकार्य लाभले. तसेच सदर कार्यक्रमाला राजीप गटशिक्षणाधिकारी पिंगळा सर रेवस केंद्रप्रमुख विनोद पाटील उपस्थित होते.

# कास्प संस्था करणार विद्यार्थ्यांचा विकास

**पेण : प्रतिनिधी**

कास्प युनिट पेण सालाबादप्रमाणे या वर्षीही १० वीच्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन शिबिर पेण येथील रामेश्र्वर हॉलमध्ये घेण्यात आले. त्यावेळी या नवनिर्वाचित कास्प पेण युनिट चेअरपर्सन ॲड.डॉ. निता कदम यांनी शिबिरास भेट दिली. त्यावेळी मुलांना मार्गदर्शन करताना सांगितले की, १० वी नंतर विद्यार्थ्यांच्या व्यक्तीगत विकासासाठी कास्प संस्था सर्वतोपरी मदत करेल.

या शिबिरामध्ये सायन्स विषयाचे मार्गदर्शन ज्योती पाटील-मुंबईकर, गणित विषयाचे मार्गदर्शन संतोष पाटील, इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन पाठक सर यांनी केले. या शिबिरासाठी पेण, कांदळे, कांदळेपाडा, शिर्की, आमटेम, आपटा, डोणवत, नारंगी येथील ७० विद्यार्थी उपस्थित होते.

शिबिर यशस्वी होण्यासाठी कास्प प्रकल्प व्यवस्थापिका निवेदिता ठाकोर, किरण कदम सोशलवर्कर, यांनी विशेष मेहनत घेतली.




## रुद्रवली राजिप शाळा येथे तळाशेत केंद्राची शिक्षण परिषद

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील तळाशेत केंद्राची शिक्षण परिषद राजिप शाळा रुद्रवली येथे अत्यंत उत्साहात झाली. या शिक्षण परिषदेला तळाशेत केंद्राचे केंद्रप्रमुख गणेश ढेपे, रुद्रवली शा.व्य.स.अध्यक्षा निकीता दांडेकर तसेच प्रमुख अतिथी म्हणून वावे दिवाळी केंद्राचे केंद्रप्रमुख सुधीर निकम उपस्थित होते.

शैक्षणिक विचारांची व उपक्रमांची देवाणघेवाण करण्यासाठी आयोजित केलेल्या या शिक्षण परिषदेला मान्यवरांनी मार्गदर्शन केले. तालुकास्तरावरील क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धेमध्ये नावलौकिक मिळवणाऱ्या वाढवण, तळाशेत, करंजेवाडी (आदी.) शाळांचा या परिषदेत सत्कार करण्यात आला. यानंतर तज्ञ मार्गदर्शक शिक्षकांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजित पवार यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रुद्रवली शाळा मुख्याध्यापक अमोल गुरव व कोल्हाण शाळा मुख्याध्यापक अशोक आव्हाड व शिक्षिका दर्शना माळकर व शाळा व्यवस्थापन समिती रुद्रवली व कोल्हाण यांनी विशेष मेहनत घेतली.



## वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यक्रम




**खालापूर : रामप्रहर वृत्त**

भाजप खालापूर पूर्व मंडल अध्यक्ष सनी यादव यांच्या वाढदिवसा निमित्ताने दूरशेत ग्रामपंचायत हद्दीतील तुरमाळ येथील आदिवासी बांधवांना लोकउपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर तुरमाळ येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वर्षभर लागला शेषनिक साहित्य देणार असल्याचे कबूल केले यावेळी आदिवासी बांधवांना खूप आनंदी व चेहऱ्यावर समाधान दिसून आले.

राजकीय शेत्रात कमी वेळात युवा नेतृत्व म्हणून काम करणाऱ्या सनी यादव यांनी असेच सामाजिक उपक्रम करत राहावे असे वक्तव्य प्रल्हाद केणी यांनी करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या वेळी कर्जत विधानसभा संपर्क प्रमुख प्रल्हाद केणी, रवींद्र पाटील खालापूर तालुका सरचिटणीस भाजप, हरिभाऊ जाधव वाहतूक सेल अध्यक्ष, दीपक जगताप खालापूर शहर अध्यक्ष भाजपा, मोहन घाडगे शक्तिकेंद्र प्रमुख, निलेश साळुंखे बुध अध्यक्ष, अनिकेत साळुंखे तालुका संयोजक सोशल मीडिया, शुभम सकपाळ सजगाव पंचायत समिती उपाध्यक्ष, कुणाल शिंदे, सुरेश साळुंखे, प्रणित साळुंखे, विजय साळुंखे (उद्योजक) उदय साळुंखे, कल्पेश साळुंखे, पांडुरंग हिरवे, ज्ञानेश्वर पगारे, संजय साळुंखे, संतोष साळुंखे, प्रवीण मुसळे, पांडुरंग पाटील आदि पदाधिकारी कार्यकर्ते आदिवासी बांधव उपस्थित होते.

# तन्वी पाटीलचे साउथॅम्प्टन युनिव्हर्सिटीतून नेत्रदीपक यश

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या माणगांव तालुक्यातील लोणेरे व माणगांव मधिल एस.एस. निकम शाळेत सन २००२ ते २०१५ मध्ये शिक्षण घेत सातव्या इयत्तेत राज्य सरकारची शिष्यवृत्ती प्राप्त करुन तिने सन २०१५ ते २०१७ मध्ये आपले उच्च माध्यमिक ११वी व १२वीचे शिक्षण आर.वाय.के. कॉलेज नाशिक मधुन पूर्ण करुन पुढे बॅचलर ऑफ इंजिनीअरिंग (बिईचे) शिक्षण पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी मधुन पूर्ण करीत सन २०१७ ला क्लाउड सॉफ्टवेअर ग्रुप (TIBCO) कंपनीत उत्तम नोकरीत ती रुजु झाली.

परंतु (TIBCO) येथुन राजिनामा देत मोठ्या पगाराचा जॉब सोडून उच्च शिक्षणाच्या ध्येयाचा पाठलाग सुरू करीत सन २०२१ ते २०२३ जगातील शीर्ष गणल्या जाणाऱ्या विद्यापीठांमधील एक लंडन येथील साउथॅम्प्टन युनिव्हर्सिटीतून मास्टर ऑफ सायन्स इन कॉम्प्युटर सायन्स (एमएस) पदव्युत्तर पदवीचे शिक्षण यशस्वी रित्या पूर्ण करीत नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे. विशेष म्हणजे मास्टर्स दरम्यान दोन इंटर्नशिप पूर्ण करणाऱ्या तन्वीने बॅडमिंटन, चित्रकला, पाककला हे आवडीचे छंद जोपासत, कथ्थक नृत्याचे ५ व तबल्याचे ३ स्तर पार केले आहेत.



लोणेरे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर युनिव्हर्सिटीमधिल माजी परिक्षा नियंत्रक, प्राध्यापक योगेश पाटील यांच्या सुकन्या तन्वी पाटील हिने ग्रामीण विभागात शिक्षण घेऊन देखील हे नेत्रदीपक यश मिळविले आहे. नुकतेच लंडन येथे एका शानदार दिक्षांत समारंभात तिला मान्यवरांचे हस्ते पदवी प्रदान करून गौरविण्यात आले आहे. या वेळी तन्वीचे वडिल प्राध्यापक योगेश पाटील आई उज्वला पाटील यांचे सोबत त्यांचे आप्तेष्ट तुषार अहिरे व ज्योती अहिरे हे लंडन येथील कन्व्होकेशन दिक्षांत समारंभास उपस्थित होते.

## चौथ्या दिवसाअखेर ऑस्ट्रेलिया ९ बाद २८८

# एकूण ३३३ धावांची आघाडी

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

बॉक्सिंग डे कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावात नऊ गडी गमावून २२८ धावा केल्या आहेत. पहिल्या डावाच्या आधारे त्यांच्याकडे १०५ धावांची आघाडी होती. अशा स्थितीत संघाची एकूण आघाडी ३३३ धावांची झाली आहे. स्कॉट बोलंड आणि नॅथन लायन या जोडीने शेवटच्या विकेट्साठी झुंजायला लावले. दरम्यान, जसप्रीत बुमराने चार विकेट्स घेऊन भारताचे सामन्यात पुनरागमन केले आहे.

ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४७४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताचा पहिला डाव रविवारी सकाळीच ३६९ धावांवर आटोपला होता. आता सोमवारी ९८ षटकांचा सामना होणार आहे. सुरुवातीच्या सत्रात भारतीय संघ ऑस्ट्रेलियाला किती लवकर गुंडाळतो, हे पाहणे उत्सुकतेचे असेल तसेच भारताला मेलबर्न कसोटी इतिहास



रचण्याची संधी आहे, कारण येथे सर्वाधिक ३३२ धावांचा यशस्वी पाठलाग इंग्लंडने १९२८मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध केला होता.

लायन आणि बोलंड या कांगारूंच्या शेपटाने भारताचे सर्वाधिक नुकसान नुकसान केले आहे. ११० चेंडूत म्हणजेच दोघांनी मिळून सुमारे १८ षटके खेळली आहेत. दिवसाच्या शेवटच्या षटकात टीम इंडियालाही संधी मिळाली, मात्र बुमराहचा तो चेंडू नो बॉल होता. बुमराहचा नो बॉल लायनच्या बॅटची कडा घेऊन केएल राहुलच्या हातात विसावला होता, पण नो बॉलमुळे लायनला जीवदान मिळाले.

दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाची फलंदाजी खराब राहिली होती. मार्नस लबूशेनने सर्वाधिक ७० धावा केल्या. त्याचवेळी कर्णधार पॅट कमिन्सने ४१ धावांची खेळी साकारली. याशिवाय लायन-बोलंड जोडीने डाव सावरला. ऑस्ट्रेलियाच्या पाच फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. यामध्ये सॅम कॉन्स्टास (८), ट्रॅव्हिस हेड (१), मिचेल मार्श (०), लेक्स कॅरी (२) आणि मिचेल स्टार्क (५) यांचा समावेश आहे. उस्मान ख्वाजा २१ धावा करून, तर स्टीव्ह स्मिथ १३ धावा करून बाद झाला. भारताकडून आतापर्यंत बुमराहने चार आणि सिराजने तीन विकेट्स घेतल्या आहेत. रवींद्र जडेजाला एक विकेट मिळाली.

### शेपटाने फोडला भारताला घाम

स्कॉट बोलंड आणि नॅथन लायन या जोडीने ११० चेंडूत दहाव्या विकेटसाठी ५५ धावांची भागीदारी केली आहे. लायन ४१ धावांवर नाबाद असून बोलंड १० धावांवर करून साथ देत आहे. ऑस्ट्रेलियाला १७३ धावांवर नववा धक्का बसला. यानंतर 'कांगारू'च्या शेपटाने भारताला प्रचंड घाम फोडला आहे.

# जसप्रीत बुमराहचे विक्रमी 'द्विशतक'

## कसोटीत दोनशे विकेट्सह रचला नवा इतिहास

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा प्रमुख स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराह याने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या डावात ट्रॅविस हेडची शिकार करत कसोटी कारकिर्दीतील दोनशे विकेट्सचा खास पल्ला पार केला. सर्वात कमी सरासरीने हा पल्ला गाठत जसप्रीत बुमराह क्रिकेट जगतातील नंबर वन गोलंदाज ठरला आहे. एवढेच नाही हेडपाठोपाठ मिचेल मार्शची विकेट घेत त्याने बॉर्डर-गावसकर ट्रॉफी स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स घेण्याचा विक्रमही नावे केला.



ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या डावात सलामीवीर सॅमच्या रूपात जसप्रीत बुमराहने संघाला पहिले यश मिळवून दिले होते. ट्रॅविस हेड मैदानात आल्यावर कर्णधार रोहित शर्माने पुन्हा चेंडू बुमराहच्या हाती दिला. कर्णधाराचा विश्वास सार्थ करत बुमराहने हेडला पहिल्याच चेंडूवर नितीशकुमार रेड्डीकरवी झेलबाद केले. यासह कसोटीत बुमराहने २०० विकेट्सचा पल्ला पार केला.

हेडच्या विकेटसह बुमराहने बॉर्डर-गावसकर ट्रॉफी एका मालिकेत सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या बेन हिल्फेनहॉस विक्रमाशी बरोबरी केली. या ऑस्ट्रेलियन गोलंदाजाने २०११-१२च्या स्पर्धेत २७ विकेट्स घेतल्या होत्या. बुमराह आता २९* विकेट्ससह अव्वल स्थानावर आहे.

### 'जम्बो' विक्रम मोडला

बॉर्डर-गावसकर ट्रॉफीतील एका हंगामात सर्वाधिक विकेट्सचा विक्रम भारताचा फिरकीपटू हरभजन सिंगच्या नावे आहे. भज्जीने २००१-०२च्या हंगामात ३२ विकेट्स घेतल्या होत्या. आर. अश्विनने २०१२-१३च्या हंगामात २९ विकेट्स घेतल्या, तर अनिल कुंबळेने २००४-०५मध्ये २७ विकेट्स नावे केल्या होत्या.

## रोहा तालुका प्रीमियर लीगला मंत्री आदिती तटकरेंकडून शुभेच्छा




**रोहे : प्रतिनिधी**

रोहाजवळील भुवनेश्वर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात रोहा तालुका प्रीमियर लीग टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.

या वेळी माजी सरपंच नरेश पाटील, पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, चंद्रकांत पार्टे, जयवंत मुंडे यांच्यासह रोहा तालुका प्रीमियर लीगचे पदाधिकारी, सहभागी खेळाडू व प्रेक्षक उपस्थित होते.

या स्पर्धेचे चांगल्या पद्धतीने आयोजन करण्यात आले असून थरारक सामने पहावयास मिळत आहेत. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंना माझ्या शुभेच्छा आहेत. पुढच्या वर्षी या लीगच्या उद्घाटन अथवा बक्षीस वितरण समारंभाला राज्य व देशपातळीवरील खेळाडूंना आणण्याचा मानस मंत्री आदिती तटकरे यांनी या वेळी व्यक्त केला.

## 'टी-२० क्रिकेटर ऑफ द इयर'साठी अर्शदीप सिंगला नामांकन

**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसीने या वर्षीच्या पुरुषांच्या टी-२० क्रिकेटर ऑफ द इयर पुरस्कारासाठी खेळाडूंना शॉर्टलिस्ट केले. चालू वर्षात टी-२० क्रिकेटमध्ये चमकदार कामगिरी केलेल्या खेळाडूंना हा पुरस्कार देण्यात येतो. शॉर्टलिस्ट केलेल्या खेळाडूंमध्ये भारतच्या अर्शदीप सिंगचा समावेश आहे. आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे या यादीत जसप्रीत बुमराह, हार्दिक पांड्या यांच्या अगोदर अर्शदीपची निवड करण्यात आली आहे.

आयसीसी टी-२० क्रिकेटर ऑफ द इयर नामांकन केलेले खेळाडू सिकंदर रझा (बांगलादेश), ट्रॅव्हिस हेड (ऑस्ट्रेलिया), बाबर आझम (पाकिस्तान) आणि अर्शदीप सिंग (भारत) हे आहेत. यंदाच्या वर्षात भारताकडून अर्शदीपची कामगिरी चमकदार राहिली आहे. त्याने २०२४मध्ये एकूण १८ टी-२० सामने खेळले आहेत, ज्यात १३.५च्या सरासरीने ३६ विकेट्स घेतल्यात.



**पनवेल :** श्री गणेश क्रिकेट क्लब, डांगणेश्वर क्रिकेट क्लब, आई गावदेवी क्रिकेट क्लब आणि स्व. रामदास फडके प्रतिष्ठान यांच्या वतीने मोरबे येथे रामदास फडके स्मृती चषक २०२४ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस भूपेंद्र पाटील तसेच बाळाराम उसाटकर यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी अरुणशेठ भगत यांनी आराध्या इंटरप्रायजेसचे मालक राजेश फडके यांचे उत्कृष्ट आयोजनाबद्दल कौतुक केले.



**पनवेल :** दोस्ती ग्रुप आणि दोस्ती स्पोर्ट्स विहिघर यांच्या संयुक्त विद्यमाने भूपेंद्र पाटील चषक २०२४ या मर्यादित क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विहिघरच्या साई मैदानात रंगलेल्या या स्पर्धेस भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, अनुसूचित जाती सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील आदींनी भेट देत आयोजनाबद्दल कौतुक केले.



**पनवेल :** आकुर्ली येथे आई गावदेवी क्रिकेट संघाच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२४चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, अनुसूचित जाती सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, भाजप तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील तसेच रोशन पाटील व इतरांनी भेट देली. त्यांचे आयोजकांनी स्वागत केले.

# जागतिक पिंच्याक सिलॅट स्पर्धेत महाराष्ट्रातील खेळाडूंचे यश



**पाली : प्रतिनिधी**

२०व्या वरिष्ठ व पाचव्या ज्युनिअर वयोगटातील जागतिक पिंच्याक सिलॅट स्पर्धा नुकतीच दुबई व अबूधाबी येथे झाल्या. या स्पर्धेत भारतातील विविध वयोगटांमधून १२० खेळाडू सहभागी झाले होते. त्यात महाराष्ट्रातील १५ खेळाडूंची निवड झालेली होती. त्यांनी चांगली कामगिरी करत तीन रौप्य व नऊ कांस्यपदके पटकावून भारताचे व महाराष्ट्राचे नाव जागतिक स्तरावर उंचावले आहे.

इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले यांनी या २०व्या जागितक पिंच्याक सिलॅट स्पर्धेत अवघ्या १३ वर्षाच्या पदार्पणानंतर रौप्यपदक पटकावून खेळाडूंसमोर आदर्श ठेवला.

भारतासाठी किशोर प्रकाश येवले, हर्षवर्धन अनंत भोसले, प्रथमेश दत्तू दातीर यांना रौप्य; तर शिवतेज दिनेश पाटील, अर्णव सचिन गवई, रामचंद्र दीपक बदक, सोमनाथ सहदेव सोनवणे, कृष्णा नर्सिंग पांचाळ, पियुष अभय शुक्ला, रिया राजेश चव्हाण, प्राजक्ता प्रभाकर जाधव, भक्ती शिवाजी किल्लेदार यांनी कांस्यपदके पटकावली. सर्व खेळाडूंना इंडियन पिंच्याक सिलॅटचे अध्यक्ष किशोर येवले, चेअरमन मोहम्मद इक्बाल, महाराष्ट्र पिंच्याक सिलॅटचे अध्यक्ष सुरेंद्र प्रताप सिंह, खजिनदार मुकेश सोनवणे तसेच सुधीर वाडकर व सर्व सदस्य प्रोत्साहन दिले. व यशाबद्दल अभिनंदन केले.

# रायगड जिल्हा अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेला प्रारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे रायगड जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कुस्ती स्पर्धेला प्रारंभ झाला आहे. जिल्ह्यातील पुरुष व महिला कुस्तीपटू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. या स्पर्धेतून रायगडचे पुरुष व महिला कुस्ती संघ निवडले जाणार आहेत. हे संघ महाराष्ट्र राज्य निवड चाचणी कुस्ती स्पर्धेत सहभागी होतील.



रायगड जिल्हा कुस्तीगीर संघ, अलिबाग तालुका कुस्तीगीर संस्था व हनुमान तालिम संघ वाडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने खासदार सुनील तटकरे कुस्ती प्रशिक्षण केंद्र वाडगाव येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सब ज्युनिअर मुले व मुली, खुला गट पुरुष गादी व माती, महिला व पुरुष खुला गट, ग्रिक्रो रोमन, बालगट व मुली अशा गटांमध्ये ही स्पर्धा खेळवली जात आहे.

वाडगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सारिका गणेश पवार, माजी सरपंच सीताराम भगत, मधुकर भगत, सरिता भगत यांच्या उपस्थितीत रविवारी (दि. २९) या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष जयंद्र भगत, सरचिटणीस मारुती आडकर, कार्याध्यक्ष सुभाष घासे, उपाध्यक्ष भगवान धुळे, उपाध्यक्ष नंदू म्हात्रे, माजी अध्यक्ष बळीराम पाटील, तांत्रिक चिटणीस राजाराम कुंभार, सहतांत्रिक चिटणीस प्रमोद भगत, पेण तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष हरिश्चंद्र शिंदे, खालापूर तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष डॉ. सुनील पाटील, महाड तालुका कुस्तीगीर संघाचे संघाचे अध्यक्ष वैभव सकपाळ, केशव पाटील, चंद्रकांत भगत, नीलिमा भगत, दिलीप कचरे आदी या वेळी उपस्थित होते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com